म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २२२
२५७१९२५
REFBK-0002824

ग्रं. ठाणे
२२

# गद्यकान्तारांतील फुलें.

रचनाकार—
कविभूषण

यशवंत गणेश खापर्डे,
उमरावती

REFBK-0002824

सन

किंमत ८ आणे.

# पुनःप्रकाशन.

## नवीन धर्मावताराची भूमिका.

आनंदानें हृदय उचंबळून सोडणारा रमणीय उषःकाल नुकताच संपत होता व नयनमनोहर अरुणोदय होणार होता—किंबहुना झालाच होता, व सायंकाळ होणाऱ्या आत्म्याच्या भानाप्रमाणें नयनांना अनंत सृष्टि दिसते—दिसतेशी भासत होती व अनंत सृष्टीला भगवान् भास्कर उगवतो—उगवतोसा भासत होता. अशा वेळीं एका अतिशय डोंगराळ प्रदेशातील एका अति उच्च टेकडीवर एक मनुष्य अगदीं एकटा उभा होता. त्याच्या अंगांत पांढरा स्वच्छ घेरदार अंगरखा होता, पायांत तसलीच एक स्वच्छ तुमान होती, खालीं लाल भडक चढाव होता जुन्या काळच्या भाटाप्रमाणें त्यानें कमरेला भरजरीचा शेला बांधलेला होता त्या मनुष्यानें ऐटबाज कल्ले राखलेले होते व डोक्यावर अरुणोदयाच्याच रंगाची एक पिळदार पगडी घातलेली होती. स्वतःच्या धिप्पाड व मजबूत बांध्याला साजेल अशी त्याच्या हातीं एक उंच काठी होती. कांहीं तरी विलक्षण विचार मनांत घोळत असावा असें वाटण्याजोगी त्याची त्या वेळीं मुद्रा होती. एकाएकीं मनांत कांहीं विचार येऊन त्यानें एकदा वर, तेज दाटून फुटू पाहणाऱ्या पूर्व दिशेकडे पाहिलें—तेजाच्या लखलखाटांत सर्व लहान तारे मावळले होते. पण गुरूचा देदीप्यमान तारा त्याहि वेळीं त्या तेजाचे वर आकाशात एकटा चमकत होता! त्या पुरुषानें एकदां विलक्षण दृष्टीनें त्या

ताऱ्याकडे पाहिलें, एकदां त्या उजळ पूर्व दिशेकडे पाहिले, एकदम चेहऱ्यावरचा भाव बदलून वरील नीलाकाशाकडे पाहिलें व अति शान्त, अति गंभीर व परम कारुणिक दृष्टीनें एकदा टेकडीच्या खालीं पसरलेल्या अफाट व विस्तीर्ण जगताकडे पाहिलें. एकाएकीं त्याच्या चेहऱ्यावरचा भाव बदलला रणांगणावर समशेर गाजवून विजय-श्रीची माळ हक्कानें व डौलानें गळ्यांत रुळवीत बेगुमानपणानें जग तुडवीत चालणाऱ्या उद्दाम समरवीराच्या डोळ्यांतील विलक्षण चमक एकदम त्याच्या डोळ्यांत झळकली सटक्यासरसें त्यानें पुनः वर एकदां टखलखणाऱ्या पूर्व दिशेकडे पाहिलें, त्या लख-लखणाऱ्या ताऱ्याकडे पाहिलें, वरच्या अनंत नीलाकाशाकडे पाहिलें – त्याच्या अंगावर शहारून रोमांच आले! त्याचा बलिष्ठ देह एकदा नखशिखान्त कांपला, व काय वाटून कोण जाणे, त्यानें आपल्या हातांतील उंच काठी जवळच्या एका मोठ्या पाषाणावर टेकली व त्यावर चपलतेनें उडी मारून, डोळ्यांत अपूर्व तेज चमकणाऱ्या त्या धिप्पाड पुरुषानें आपल्या खड्या व खणखणीत आवाजांत पुढील चूर्णिका म्हटली. ती ऐकून मला काय वाटलें असेल तें माझें मलाच माहीत. मी जशी ऐकली तशीच ती येथें सादर करीत आहे:—

[ वृत्त—भाटाचें मोठ कवीत ]

जयजयकार महाराज !—

तुग नग भगुनी स्वर्ग उजळुनी,
गगन हें भेदुनी, शब्द आला ।
' धर्म जो रक्षितो, नीति सांभाळितो,
ज्ञानमार्तंड तो, जवळि आला ! ॥
स्वार आले पुढे, सजलि जी सकडे
मार्गि आली पुढें, वागण्याला ।
गगन हे गर्जतें धरणि ही बोलते,
' धर्ममार्तंड तो जवळि आला ' ! ॥ १ ॥
ध्वांत विध्वंसि जो, दुःखभय नाशि जो,
दुनरपी एक तो दिवस आला ।
कांहि जगतांतले, थोर जन जागले,
सासुरे जाहले, ध्यावयाला ॥
अजुनि रे निजु नका, ज्ञानरविचा टिका
उमटतो नेटका गगनभाळा ।
जागृहो, जागृहो ! लोकहो सर्वही !
ज्ञानमार्तंड तो उदयि आला ! ॥ २ ॥
पैस हे लोकहो ! पैस सृष्टीसखे !
पैस आम्ह्या ! उभा शांत राहे ।
टाप ही वाजते, दळ पुढे चालतें,
ज्ञानसम्राट्प्रभू पातलाहे ! ॥
पैस हे ध्वांत रे ! पैस हृदया सडे
पैस रे मानसा ! स्वस्थ राहे ।

2228
रा. क

टाप ही वाजते, दल पुढें चालते,
ज्ञानसम्राट्प्रभु पातलाहे ! ॥ ३ ॥
दुंदुभी गरजला, ही ध्वजा फडकली,
बीनहि[1] धडकली स्वारि आली ! ।
जगत रे ! जागृहो, स्वारि आलीच ही,
शिंग हें वाजतें, - स्वारि आली ! ॥
अंगणें झाडुनी, कुंकुमें सिंचुनी,
तोरणें लावुनी, जगत सजवा ।
वाद्य जें जें असे मंजु मंगल जगीं,
सर्व तीं अंगणीं सज्ज ठेवा ॥ ४ ॥
भक्ति भगिनी गडे ! घालि अंगणिं सडे,
पर्व हें केवढें, आज आलें ।
पाहि गे पाहि गे ह्या उषःकालि हें,
उजळ तेजामध्य विश्व न्हालें ॥
शुभ अशा या क्षणीं, न्हाउनी माखुनी,
त्यासि ओवाळण्या सज्ज होई ।
ऊठ गे भामिनी ! प्रेमघृत घालुनी
लावुनि निरंजना हातिं ठेवी ॥ ५ ॥
स्नान उरकोनिया, तिलक लावोनिया,
शुद्ध होवोनिया सिद्ध व्हा हो ।
पर्ण देवोनिया, पुष्प वाहूनिया,
भक्तिनें वंदुनी धन्य व्हा हो ॥

---

१. ' बिनी '--हि म्हणतात सैन्याची आघाडी.

ज्ञानरविहा असा नच दिसे फारसा;
उदये फारां दिसां त्यासि येतो ।
नयन झाकू नका, श्रवण रोधू नका,
ज्ञानरवि हा पहा उदयि येतो ॥ ६ ॥
सत्प्रभा फाकली, पूर्वदिक् उजळली,
मंजु खगमंडळी गाउं लागे ।
गंधयुत मंद हा वायु वाहे पहा,
शांतिसंदेश हा स्पष्ट सांगे ॥
' शीत जो सहरी, ध्वांतगजकेसरी,
ज्ञानरूपी तो हरी येत आहे ' ।
जागृहो ! जागृहो ! लोक हो सर्वही !
ज्ञानमार्तंड तो उगवताहे ॥ ७ ॥
पूर्वि जरि येत तो, मागुनी उमगतो.
आर्धि आता झडे म्हणुनि डंका ।
नयन हे झाकुनी, श्रवणही बांधुनी,
घोरवी दावुनी काय शंका ? ॥
नयन उघडोनिया, कर्ण देवोनिया,
हट्ट सोडोनिया, नीट देखा — ।
पातला महितला, त्या जगन्मंगला;
ज्ञानधर्मासि जो, पाठिराखा ॥ ८ ॥

[ २ ]

**जयजयकार महाराज !—**

एक रवि ज्यापरीं नित्य तम संहरी
एक रवि त्यापरीं ज्ञान देतो ।

रश्मि आते सर्व बिंब नव भासत,
ओळख य न की, एक हा तो ॥
येत परि तोचि तो; जाणत्या उमगतो;
केवल त्याचें तरी सत्य माला।
भिन्न देशामध, भिन्न कालामधें,
एक रवि नळपलो ज्ञानराणा ॥ ९ ॥
भिन्न देशामधे, भिन्न कालामधें,
भिन्न जनतेमधें, भिन्न भासे।
भिन्न आकाश तें, त्यामुळें भासतें;
बिंब परि तचि तें नित्य विकसे ॥
पूज्य रवि कालचा, त्याज्य रवि आजचा,
पूज्य येथ रवी, तेथ नोहे।
काय ऐसें कधीं सुज्ञ बोले सुधा?
इष्ट हा अपसा काय नोहे? ॥ १० ॥
व्यर्थ भिडू नका, नीट हें आयका,
पाहुनी मागुनी कांहि बोला।
काल नच संपला, पूर्वि जें जाहलें
काय बाधा पुन्हा व्हावयाला? ॥
काल अति लोपला, काल अति राहिला,
आजही हा नवें काल आहे।
पूर्वि कालामध, आज कालामधे,
व्हावया बोध हा तचि आहे? ॥ ११ ॥
सूर्य नाहीं नवा, चंद्र नाहीं नवा
गगनही हे नव आज नाहीं।

नारका नच नव्या, नाहि आत्मा नवा,
ज्ञानरवि हा तमा नविन नाही ॥
वर्तमानाप्रती नित्य जन दूषिती,
लोटना तोंचि परि गोड गमतो ।
दूरचें नच दिसे, जवळिचें दिसतसें,
काळ परि सारखा नित्य असतो ॥ १२ ॥

[ २ ]

**जयजयकार महाराज !—**

दासहो ! एक व्हा, नौबती वाजवा,
जगत हें हालवा घोर नादें ।
भेरि फुंका अतां भेरि फुंका अता,
भेरि फुंका अतां, घोर मोदें ॥
दुमदुमो दुंदुभी गगन भेदूनिया,
जगतही थोडकें आज जागो ।
कीं रवी तो पुन्हां आज येतो जगा,
हें असे या जना वाटु लागो ॥ १३ ॥
युद्ध होई तरा युद्धही होउं द्या;
युद्ध होणार हें निश्चयानें ।
दाल्भ्य सोडू नका, घाईही करूं नका;
स्वस्थ परि बसु नका खिन्नतेनें ॥
शांति नच सोडितां डंक हा वाजवा,
दशदिशा भेदुनी डंक जावो ! ।
येत जव तो रवी येत तो या मही,
येवढें नव तरी ख्यात होवो ॥ १४ ॥

बाण सतिचें करीं आज अम्हि घेतलें,
प्राण गेले तरी प्राण देऊं ।
नाथ तो आमुचा कधिं न परि सोडिता,
शीलही आमुचें शुद्ध ठेवूं ॥
जग हसो, जग छळो, दुःख देवो अम्हा,
– दुःखही सोसणें भाग्य आहे – ।
जगहितासाठि परि सांगु हें निशिदिनीं
कीं, ' तुम्हां ज्ञानरवि उगवताहे ' ॥ १५ ॥
नाहिं दुःखाप्रती भीत आमुची मती,
दुःख कोणासि रे नाहि झालें ? ।
नाहिं सकळांसि परि भाग्य हें लाभलें,
आम्हि हें जेवि जाहीर केलें – ॥
कीं, ' रवी येत रे, ज्ञानरवि येत रे,
जीवनें कीं मनें शुद्ध राखा ' ।
मान हा आमुचा, दुःख या हो किती;
देव आहे अम्हां पाठिराखा ॥ १६ ॥
कष्ट सोसू अम्ही, दुःख सोसू अम्ही,
जगतिं उपहासही सहज सोसूं ।
यातना सर्वही त्याचिया कारणें
शांत चित्तें अम्ही सहज सोसूं ॥
सागतों परि तुला -- सांगण्या पातलों,
ऐक बा रे जगा ! मुक्तकर्णीं ।
' ज्ञानरवि पातला, जवळि रे पातला;
चाळलों हे पहा बीन आम्ही ' ॥ १७ ॥

[ ४ ]

**जयजयकार महाराज !—**

तव न कधि चांगुलें, मम न कधि वांगुलें,
ह्याचि जगतामधें न्याय झाला ।
शब्द ते राहिले, फारही माजले,
सत्य परि लोपलें — अर्थ गेला ॥
कोणि नच पाहतो — " काय मी हें वकें, "
" हें जुने " म्हणुनिया तृप्ति त्याला ।
ऐसी महाभाग ! झाली अवस्था,
अता कोण छेदी तुझेवीण इजला ? ॥ १८ ॥
कितीही भलें तें नवे त्याज्य वाटे,
स्वतंत्रा विचारा करी ना कुणी ।
आज जगतामधें शांति नाहीं कुठें,
कलह जेथें तिथें येत कानीं ॥
प्रश्न अति जाहले, उत्तरें संपलीं;
मनुजकृतिचा अतां हद्द झाली ।
तू न येतां विभो ! सोडवी प्रश्न हे
कोण आतां वदे अंशुमाली ? ॥ १९ ॥

[ ५ ]

**जयजयकार महाराज !—**

देवदेवांप्रती वद्य जो संप्रती,
योगमायापती ज्ञानसूर्या ! ।
या पुन्हां या पुन्हां, ह्या जगा या पुन्हा
चरणरजदर्शना आज द्याया ॥

पूर्वी न च पाहिले, कोण जाणे पुढें !
पाय ते आपुले आज दावा ।
एकदां पाहुनी, अश्रुजल वाहुनी,
धन्य वाटे मनीं जीव व्हावा ॥ २० ॥
गिरिगिरीभीतरीं सकल मंदिरें वरी
सर्व द्विज धावले अर्घ्य द्याया ।
हीन आम्ही तिथें, दीन हे बापुडे,
आमुचा त्यांपुढें काय केवा ! ॥
येसि वा तू परि आमुचेसाठिं गा,
धन्य आह्मी तुला पाहणारे ।
तूंचि वा शक्ति दे तूंचि वा कार्य घे,
जागवी लोक हे झोपणारे ॥ २१ ॥
शान्तता यो पुन्हा, शुद्धता यो पुन्हा,
प्रेम येवो पुन्हा, पूर्वकाळीं—— ।
व्यास जे येत तें, बुद्ध जे येत तें,
कृष्ण जें येत तें, जेविं आलीं ॥
प्रेम जनि वाढलें, त्यागि जन जाहले,
स्वार्थ खल हारला कांहि काल !
हे विभो ! तेविं हो, जगत निःस्वार्थि हो;
यो दया मागुती सर्वकाळ ॥ २२ ॥
शेवटीं विनवितों येथूनें तुजप्रती,
शीघ्र धावी अता, धाय वा ते ।
धन्य नर पाहुनी, धन्य रवि दावुनी,
धन्य तिज लागुनी धरणि होते ॥

धन्य ज्या लागुनी वायु होतो जनीं,
धन्य जळ ज्याप्रतीं धुवुनि होतें ।
धन्य आकाश त, मूर्ति ती धरित जें,
पुण्यपद हे विभो ! दावि वा शीघ्र ते ॥ २३ ॥

[ ६ ]

**जयजयकार महाराज !—**

जगि, दयाळा, परी दुष्टतेची सुरी
अणु–अणूच्या वरी ठेविलीसे ।
कटकाच्या मुळें जगत हें कोंदलें,
पाय ते कोवळे पाहु कैसे — ॥
कटकीं ठेविले, कटकीं कष्टले,
त्याहुनी हे भले प्राण गेले ! ।
शेषशायिन् ! नको पाहणें तें नको,
ठेल मृदु पाय ते कष्टलेले ॥ २४ ॥

जगतिं जें भाजलें, रुधिरही टपकलें,
उदयिं तव हरिखेलें, अधिर झालें ।
हृदय माझें असें, उमललें कमलसें,
त्यावरी कोवळे, पाय अपुले — ॥
अधि ठेवी, विभो ! जपुनिया जगतिं ये;
चाल मग हळुहळू हृदयमार्गें ।
आज जगतांमधें साळ्यापोळल्या
सकल हृदयां तुझी आस लागे ॥ २५ ॥

ग्रंथ क्र. २०८

[ ७ ]

जयजयकार महाराज !—

येत तू ऐकुनी, बुद्धिनें शोधुनी,
येत तू पाहतां हर्षयोगें — ।
मत्त जो जाहला, मार्गि जो लागला,
जाउ जो पाहतो कर्मयोगें ॥
वाट पाहे तुझी, आस नाही दुजी,
कार्य करण्या तुझें सिद्ध झाला ।
एक जन दीन हा, दास तव लीन हा,
भाट बलवत हा, कवन तव गायिला ॥ २६ ॥

---

# लपलेला गंधर्व.

( वृत्त—शार्दूलविक्रीडित )

कोणाचें अति दूर गान मजला हें ऐकु येतें बरें ? ।
आहे भासचि, कीं तिथें बसुनिया हें गात कोणी खरें ? ॥
गाणें हें, बसुनी इथे उगिच कां, हा निर्जनीं गातसे ? ।
कां हें एकुनिही मला गमत कीं ' आकर्षि मातें असें ? ॥ १ ॥

येथें तो जरिही असेल बसला गाणें उगें छेडित ।
येथ निर्जनि व्यर्थ काय न कळे गाऊनि त्या लाभत ? ॥
माझेंकारण मानु मी जरि असा हा गात तेथें बसे ।
का हा दूरचि निर्जनीं तरि असा कीं एकला गातसे ? ॥ २ ॥

माझ्याकारण गात तो जरि असे का दूर ऐसा वसे ?।
माझ्याकारण हें नसेल तरि हें गाणें कशाला असे ? ॥
माझ्यावाचुनि येथ कोणिच नसे, मी ऐकितो एकला ।
कोणाहीकरितां नसेल तरि का हा ऐकु देतो मला ? ॥ ३ ॥

माझ्याकारण हें असेल तरि कां हा दूर गातो असा ? ।
माझ्यासन्निध बैसुनी नच मला कां ऐकु दे नीटसा ? ॥
गाणाऱ्या ! वद, कोण तू ? कुठुनि, वा आलासि तू केवि रे ? ।
गातो का भुलवी मला परि गमे अस्पष्ट जें ऐकु ये ? ॥ ४ ॥

मातें हे न सहे, गड्या, जवळि तू येऊनिया गा तरी ।
किंवा मोहु नको मला, निघुनी तू एक कांहीं करी ॥
कोठें ना दिसशी कुठें तरि तुला शोधू मला ना कळे ।
ये गाणें श्रवणीं परी नच दिशा त्याचीहि मातें मिळे ॥ ५ ॥

ऐसा त्रास नको, नको, प्रिय सख्या, देऊ नको रे मला ।
आता ऐकुनि गान मोहुनि सख्या, हा जीव वेडावला ॥
भेटी दे, मज दाखवी लपुनिया कोठूनि गाशी असा ।
किंवा मारुनि जाळुनी करि मला वा तूंचि गे नाहिसा ॥ ६ ॥

ऐसें गायन ऐकुनी नच कळे हें कोण गातो जरी ।
आहे त्याहुनिही बरेंच जळणें, तीं मृत्युहु तें बरी ॥
ध्यानीं ठेविन हेंचि कार्य पुढतीं, गाणार शोधीन मी ।
कष्टां सोसुनिही परी कधि तरी गाणार पाहीन मी ॥ ७ ॥

# द्वैतांची फुगडी.

फुगडी रंगलि चोंहिकडे । फुगडीविण ना कांहि घडे ॥
फुगडीचें मज वेड जडे । चल आपणही खेळुं गडे ॥ ध्रु० ॥
एकामेकांतें धरितीं । द्वैतें जगतीं वागडतीं ॥
ग्रंथि करांची दृढ देती । परस्परा ओढुनि धरितीं ॥
चक्राकारें मग फिरतीं । भ्रमतीं, दुसऱ्या भ्रमवीतीं ॥
रमति, गड्याला रमवीतीं । मनुजमनाही भ्रमवीतीं ॥

जन्ममृत्युची,
जडाऽजडाची,
सुखदु:खाची,

फुगडी हो खुळली फुगडी । मनुजमनाला करि वेडी ।
परी ज्ञान ह्या मर्धें कडी । फुगडीला 'तू-मी'च गडी ॥ १ ॥
कुणा कल्पना ही सुचली । कुणीं सुरू फुगडी केली ॥
कशी सुरू फुगडी झाली । काशास्तव ही सुरु झाली ॥
उगिच सुरू तरि कां झाली । तुला-मला कां आवडली ॥
केधिं गुंतलों खेळांत । सापडलों या फुगडींत ॥

जरि सापडलां
तरि कां रमलां,
रमतां भ्रमलों,

आतां यत्नं थावे ना । कशी थांबवू उमजे ना ॥
तुला मला भ्रमवी फुगडी । फुगडीला 'तूं-मी' च गडी ॥ २ ॥

तुझा मला अमची फुगडी । किती शोभते ही जोडी ! ॥
"तू" म्हणतां मी अज्ञ ठरे । मलाहि तू "तू" म्हणशी रे ॥
आणिक याहुनि सरस अशी । मिळेल जोडी विश्वि कशी ॥
परस्परां आपण धरु या । विश्वभरीं मग खेळू या ॥

धरि मी तुजला,
तू धरि मजला,
जोड साधला !

आता थकलों तरि खेळू । रडता हसतां फेर धरूं ॥
विश्वभरीं जरि ही फुगडी । फुगडीला 'तू–मी' च गडी ! ॥ ३ ॥

दोरी एकचि ती असते । टोकीं दोन परी सरते ॥
तशी 'भावना' एकचि ती । 'बाह्यस्पर्श' जगीं वसती ॥

दोन परी नांवें वरिते[1] । एकचि दो टोकीं असते ॥
नारी बांधी रवीला[2] ती[3] । टोकें दोन करीं धरि ती ॥

मग फिरवीते,
रवि ती फिरते,
टोकें बघते,

दोन रवी बघते टोके । म्हणे "मला देती झोके" ॥
तैसी द्वैतांची जोडी । फुगडीला 'तू–मी' च गडी ॥ ४ ॥

'मी–तू' टोकें हीं साचीं । कोणा एका दोरीचीं ॥
इतरहि सारीं हीं द्वैतें । टोकें एका दोरीतें ॥

---

१. याचा कर्ता भावना. २. ताक घुसळण्याची रवि. ३ दोरी.

जीवा बांधुनि ही दोरी[1] । फिरवी दिव्या कुणि नारी ॥
महाकारणाची चरवी । जीव त्रिलोकीं फिरे रवी[2] ॥

'अनुभव' मग लें
दोणी निथतें,
चरवी भरतें,

साय सांवळा चोरुनि जें । गोपी जीव तदा साजे ॥
नारी–दोरींची फुगडी । फुगडीला 'तू–मी' च गडी ! ॥ ५ ॥

[ २ ]

फुगडी खेळति दिन–रजनी । चक्राकारें नित फिरुनी ॥
संक्रांतीची मधें कडी– । वर्षें अयनांची फुगडी ॥
रविकर धरुनी ग्रहमाला । खेळति गगनीं फुगडीला ॥
फुगडी न्हासोत्क्रांतींची । घडण तीच इतिहासाची ॥

ऐशा जोड्या
भासती गड्या,
परि, रे वेड्या,

जरी गोड वा या जोड्या । परी खऱ्या नाहींस गड्या ॥
गोड खरी रे ती फुगडी । जींत गडे 'तू–मी' च गडी ॥ ६ ॥
रवि–शशि फुगडीचेच गडी । भासति बघता ही जोडी ॥
तारा–नभही खेळगडी । विश्व खेळते ही फुगडी ॥
विकल्प वा संकल्पांची । फुगडि, मनाची जननी ती ॥
जेथ बघावें तेथ गडे । जोडी फुगडी दृष्टि पडे ॥

---

१. द्वैताची २. तारक घुसळण्याची रवि.

मौज बघोनी
ऐसी नयनीं
स्वस्थ बसोनी

चैन पडावी कशी गडे । मज फुगडीचा छंद जडे ॥
सुंदर आपण किती जोडी— । फुगडीला ' तूं-मी ' च गडी ! ॥७॥

भूत-भविष्याची फुगडी । वर्तमान ही मधें कडी ॥
कारणकार्यांची फुगडी । मनुजमनाची मधें कडी ॥
सन्निध—दूराची फुगडी । स्थलाऽभास ही खोटि कडी ॥
खेळ रंगला चोंहिंकडे । रंगानें ही भूल पडे ॥

हवे—नकोंची,
भल्या—बुऱ्यांची,
गुणाऽगुणाची,

जोडी खेळे चोंहिंकडे । चल, आपणही खेळु गडे ॥
ये ये, खेळु गडे फुगडी । फुगडीला ' तूं-मी ' च गडी ॥ ८ ॥

[ ३ ]

किती काळ खेळत आलों । खेळों तें विसरुनि गेलों ॥
जिवासि वाटे फुगडि हवी । घडी न फुगडीविण जावी ॥
किती काळ खेळेन पुढें । हें तरि सांगिल कोण गडे ! ॥
आज परि फुगडीच हवी । नित्य गमे जी गोड नवी ॥

ऐसी फुगडी,
'तूं-मी' च गडी,
चाखुनि गोडी,

खेळु घराच्या माघारीं । अज्ञानाच्या अधारीं ॥
अष्टौ प्रहरीं सर्व घडीं । फुगडीला ' तू-मी ' च गडी ॥ ९ ॥
त्रास मधें मज किति झाला ! । जीव कितीदां तळमळला ! ॥
कांटे टोचति पायाला । तमीं दिसेना नयनाला ॥
येइ कळवळा जीवाला । अश्रुहि येती नयनाला ! ॥
पाय न त्यजि परि फुगडीला । काय ह्मणू या छंदाला ! ॥

कळे मज जरी
वळेचि ना परि !
हाय रे हरी !

काय अशी ही गत झाली ! । कशी मला फुगडी जडली ॥
'तू'हि अभागी मज जोडी। फुगडीला '-तू-मी ' च गडी ॥ १० ॥
उत्क्रांतीच्या गिरिशिखरीं । कूटस्थाच्या सानुवरी ॥
अद्वैताच्या शिखरीं । माझ्या सगळ माहेरीं ॥
अशी कधीं नव्हती फुगडी—। भली सुखें परि करि वेडी ! ॥
माझें लग्न जुळें तुजशीं । खूळ जडे मग हे मजशी ॥

कारण याला
कोण जाहला,
कळे न मजला,

समर्थ, जाणुनि, मी नोहे । तू तारि थांबवि फुगडी हे ॥
तूंच मला आधार गडी—। फुगडीला ' तू-मी ' च गडी ॥ ११ ॥

[ ४ ]

अणुरेपरमाणूही । फुगडी खेळति मोदें ही ॥
त्यांतहि हरि[1] नरनारि करी । त्यातेंही फुगडी न्हेरी ॥

1. Positive and Negative or Male and Female

दृश्य जगांत तीच घडी । अणु–परमाणूंची फुगडी ॥
फुगडी कैची ?– रासचि तो । आजहि जो लपुनी घुमतो ॥

विश्वीं सारें
एकचि वारें
रासचि वारें

घुमतें दशदिग्जठरांत । अनंत त्या आकाशांत ॥
तुजविण परि त्या नच गोडी । रासाला 'तू-मी' च गडी ॥ १२ ॥

मुकुंदजी " लाडून लाला[1] । सब दुनिया पालनवाला " ॥
रास रंगुनी खेळियला । स्वर्ग जेथे नीरस केला ! ॥
आपण नव्हतों रासाला ! । मौज मिळाली गोपींला ॥
आतां 'मी' तितुकेहि हरी । 'तू' तितुक्या त्या व्रिजनारी ॥

त्या श्रीहरिपरि,
एकचि 'मी' तरि,
रूपें बहु धरि,

ये ये, रास पुन्हा खेळूं । पुनरपि रंग नवा उधळूं ॥
तुजविण नाहीं मज जोडी । रासाला 'तू-मी' च गडी ! ॥ १३ ॥

माझा 'मी' तो तुझाहि 'मी' । तुझाचि 'मी' तो माझा 'मी' ॥
एकचि असुनी दोनहि तो । दोनचि असुनी असंख्य तो ॥
असंख्य, दोनहि, एकहि जो । तोचि अशी लीला करितो ! ॥
साक्षी एकपणें डोले । दोनपणें फुगडी खेळे ॥

तोचि खेळता
असंख्य रमता
रास तोचि हा !

---

१. ह्या गोड पालुपदाचें एक हिंदी पद आहे.

रासहि, फुगडी साक्षी तो । एकचि नानापरि रमतो ॥
परी मौज ही शक्य करी । तिथें मूळ ' तू-मी ' च गडी ॥ १४ ॥
रासाचें मज वेड जडे । रासाविण ना चैन पडे ॥
चल ये, आपण खेळु गडे । आपणही खेळूच गडे ! ॥
रडलों हसलों तरि खेळू । विश्वीं रंग नवा उधळू ! ॥
रंग उधळला चोहिंकडे । चड रास हा धुमत पडे ॥

रग मातला,
विश्वीं भरला,
असह्य झाला !

माया-ईशांची फुगडी । ती फुगडी हें विश्व घडी ॥
अशी जरी झाली फुगडी, फुगडीला ' तू-मी ' च गडी ! ॥ १५ ॥

---

# कुंजवीणा.

( चाल— वधू ही वरी. )

तृप्ति होते ना । कुंजात वाजली वीणा ॥ धृ० ॥
सुगंध सुंदर, रूप मनोहर ।
स्वाद हर्षकर, नाद चित्तहर ।
स्पर्श सुधाकरशीतळ सुखकर ।
मिसळिलें याना, तरि सौख्य तेवि होई ना ॥ १ ॥

जनकीं जो त्यालाहि कळे ना ।
ऐकू येते याला वीणा ।
ज्याची त्याला परि विसर ना ।
ऐकुनी वीणा लागतें वेड जीवांना ॥ २ ॥
जीवातें तो नाद भेदितो ।
कणाकणाना आत झोंबतो ।
सुख तो आत्यंतिक परि देतो ।
मीठ जळि जाणा, विरविते जीव ती वीणा ॥ ३ ॥
निरोप आला माहेराचा ।
जीव रिझाला तथें कन्येचा ।
विसर ये सासरींच्या दुःखाचा ।
आठव सौख्याचा, रजनी गाजल्या प्राणा ॥ ४ ॥
अंतर कोंदें मंजुल नादें ।
गानाचें गमलें विश्व भोंवतें ।
प्रथमचि आता ऐकियलें तें ।
देतसे काना, लोभला जीव त्या गाना ॥ ५ ॥
मिळेल जितुकें साधक तयाला ।
गोडचि वाटे तितुकें त्याला ।
धुंद होउनी पीत रसाला ।
वाजते वीणा, गुतला जीव रसपाना ॥ ६ ॥
शुद्धप्रेमा फुटला पान्हा ।
बेसुर चुकुनी मध्ये येइ ना ।
सतत सुस्वर चाले वीणा ।
काय शब्दांना योजु मी वर्णिण्या वीणा ॥ ७ ॥

जीव गुंगला गोड रवानं ।
फुटों पाहतो प्राण सुखानें ।
अनर्थ केला मञ्जुळ गानें ।
कुणी बोले ना, जीवासि सौख्य सोसे ना ॥ ८ ॥
ऐसा रव तो आला कानीं ।
जगिं जे बेसुर, सुस्वर, दोन्ही ।
मञ्जुळ साधन नादवर्धनीं ।
नाद खवळे तो, सुख दुःख दोन्हि घेताना ॥ ९ ॥
कुणि बोले ना, कुणि चाले ना ।
शांत सर्वही, कांहिं हले ना ।
देवाघरची वाजे वीणा ।
सूर बिघडे ना, वाजली गोड ती वीणा ॥ १० ॥
कुंजावरिचे खगहि थाबले ।
पान थांबलें, फूल थांबलें।
विश्व थाबलें, शांत जाहलें ! ।
गानरसपाना, थाबला जीवमृगराणा ॥ ११ ॥
अतिशय जीवें कष्ट सोशिले ।
अती झगडिलें, अती सोशिलें ।
शिणुनी थकुनी सर्व सोडिलें ।
श्रांत पाथांतें, शांतिची झोंप सुखवीते ॥ १२ ॥
अघोर रजनी कठीण गेली ।
प्रभा गोमटी अता फाकली ।
[illegible] समाप्त झाली ।
आलि हो आली, रमणीय उषा आन्हाला ॥ १३ ॥

जीव-नदी ही फार भटकली ।
कडदऱ्यांनी फार गांजिली ।
अखेर उदधीसन्मुख झाली ।
भ्रांत हरिखानें, पाहते जीवितेशाला ॥ १४ ॥

वृष्टी झाली शांतिसुधेची ।
भूमी भिजली तइ जीवाची ।
रोपें फुटलीं सर्व शुभाचीं ।
राख भजुभांना वाजता करी ती वीणा ॥ १५ ॥

ऐका ऐका कोणी वीणा ।
कुणासि का हो ऐकु येइ ना ।
स्पष्ट येत हा रव ऐकाना ।
भाग्य मिळवाना, ऐकण्या गोड ती वीणा ॥ १६ ॥

वाज वाज गे माझ्या वीणे ।
सुखी न होई जीव तुजविणें ।
शांतिवाचुनी काय हें जिणें ।
धन्य नर जाणा, ऐकिली जयें ही वीणा ॥ १७ ॥

[ २ ]

विवेक, वैराग्यही, भक्तिही ।
तसाचि चवथा सदाचारही ।
वीण्यालार्गी खुंट्या चाऱ्ही ।
यत्न करितांना, मग चढोनि लागे वीणा ॥ १८ ॥

महाकारणा 'षड्ज' धरियला ।
जडदेहाचा 'घोर' लाविला ।
लिंग-कारणा 'जोड' बनविला ।
मोहिनी वीणा गातसे जीव हा गाना ॥ १९ ॥

ऐकुनि ऐकुनि जीव रंगला ।
स्वयंचि गाणें होऊं शिकला ।
बेसुर मारा विसरुनि गेला ।
मुक्त जीवाना, हर्षे ती ऐकुनी वीणा ॥ २० ॥

सुस्वरतेची कमाल झाली ॥
ऐशी वीणा गोड लागली ॥
समाधानवृत्तीहि जन्मली ।
लाविता वीणा अंकि घे त्यासि गुरुराणा ॥ २१ ॥

अंकीं घेता अगचि झाला ।
भिन्न कधीं नच पुन्हा निघाला ।
सर्व न हो परि अंग जाहला ।
मुक्त जीवाना, जन्मला तान्हुला तान्हा ! ॥ २२ ॥

---

# मी

सुटले तेजाचे वारे । तेज मला घाली घेरे ।
वारा सुटला जोराचा । पाउस पडला तेजाचा ॥
देह हासिचा हा सुटला । जीव कशालासा मुकला ।
झाली इच्छाची होळी । वारा तेजाचा जाळी ॥
आहे लोपें मन न कळे । फोवारे तेजीं सगळे ।
सुटले तेजाचे वारे । जाळिति विश्वा एकसरें ॥

नाम उडाले वाऱ्यात । रूप जळालें ते..
नामें नभिं म्यां पाहियलीं । चक्राकारें तीं फिरलीं ॥
स्रोत आक्रमी तेजाचा । चूरा झाला हो त्याचा ।
चूरा पडला तेजात । तेज शिरे तज्जठरांत ॥
तेजाचि नामेंही झालीं । वस्तू वस्तुपणा मुकलीं ।
गेलों वस्तूच्या जवळ । तिचे जाहले हो हाल ॥
तेजें केला कल्होळ । काहिं न उरलें परि जाळ ! ।
जाळामधुनी गभीर । 'मी' निघताहे निरंतर ॥
'मी' नच मजला तो कळला । लोंढा तेजाचा आला ।
मजवरुनी तो ओसरला । मी तो एकचि 'मी' झाला ॥
'मी' भरला या विश्वात । तेज कोंदलें गगनात ।
वारा जोराचा सुटला । विश्व जाळुनी हा आला ॥
जगतें सारीं हीं भवतीं । मी त्यांच्या मध्यावरती ।
गर्जुनि मी गभीर रवें । 'मी !' म्हणुनी जें बोलावें ॥
'मी' च दिशा दाही वदती । कालस्थलही 'मी !' म्हणती ।
आकाशेंही 'मी !' म्हणिलें । प्रतिध्वनीनें, विश्व हले ! ॥
'मी !' म्हणतां मी गगनांत । 'मी' च निघाला ताऱ्यात ।
'मी !' रव उठला चंद्रात । 'मी !' च प्रतिध्वनि रवि देत ॥
विश्व जणू ही गुहा कुणी । 'मी' म्हणतां 'मी' प्रतिध्वनी ।
आकाशीं उडतां पक्षी । खालीं जग हें जणु लक्षी ॥
तैसा तेजाचा पक्षी । झालों विश्वाचा साक्षी ।
गुह्य सृष्टिचे मज कळले । तादात्म्याने सकल कळे ।
' तदात्मता ' कीं ' तल्लीन ' । यांताचि सगळें थोरपण ॥

# तुऱ्याचें गाणें.

[ कांहीं विशिष्ट प्रकारच्या मनोरचनेच्या माणसांना कधीं कधीं एक प्रकारची योगशान्तिसारखी, राजयोगानें जशा प्रकारची शान्ति शेवटीं विलास आणावयाची तशा प्रकारची सुंदर शांति, आपोआप एकादे वेळीं उत्पन्न होते व कांहीं काळ टिकून पुन: उत्पन्न झाली तशीच आपोआप नाहींशी होते; आणि ही शान्ति नाहींशी झाल्यावर सर्वसामान्य लोकांप्रमाणें कांहींच विशिष्ट भावना नसलेली सामान्य मन:स्थिति परत न येतां, शंकाकुशंकांनीं भरलेली व अगदीं नवीनच उद्भवलेल्या चिडखोरपणानें, असहिष्णुतेनें, व अत्यन्त असमाधानवृत्तीनें परमावधीची दुस्सह अशी एक भयंकर " अशान्ति " उत्पन्न होते. 'अशान्ति' हा शब्द कानाला चमत्कारिक वाटतो, पण त्या घोर वृत्तीला जगतांत नाव नाहीं—निदान मराठी भाषेंत तरी तिला दुसरें कांहीं नांव नाहीं-हें अगदीं खरें आहे. मनाच्या कोणत्याहि एका वृत्तीसारखी अगर कोणत्याहि अनेक वृत्तींच्या मिश्रणासारखी ती भावना नसून " शान्ति "—प्रमाणेंच " अशान्ति " हीहि जीवाची अत्यंत प्रबळ व वेगळी अशी एक भावना आहे. ही " अशान्ति " उत्पन्न झाल्यानंतर ती जाण्याचा मात्र इतिहास प्रत्येकाचा वेगळा असण्याचा संभव आहे. आणि तो किती तऱ्हेनें व कोणकोणत्या रीतीनें घडून येईल हें मला कांहींच सांगता येत नाहीं श्री० " गोविंदाग्रज " ह्यांनीं आपल्या " कलगीचें गाणें " या कवितेंत असल्या कांहीं भावनांचें व आनुषंगिक अनुभवांचें वर्णन केलें

आहे. व माझें हें " तुऱ्याचें गाणें " हा त्या कवितेला उत्तर देण्याचा अल्पसा यत्न आहे. श्री० " गोविंदाग्रज " ह्यांना उत्तराच्या अपेक्षेखेरीज सदर कवितेला " कलगी " नाव देण्याचें विशेष कारण दिसत नाहीं. शिवाय खुद्द कवितेंत तीन वेळ व एकदा आरंभींच्या टांपेंत मिळून चार वेळ, त्यांनीं उत्तराची आपली अपेक्षा स्पष्ट व्यक्तहि केली, म्हणूनच केवळ ह्या उत्तराच्या अल्पशा यत्नाच्या खटपटींत मी पडलों. असल्या कविता जास्त फोडून सांगणें सभाग्राहि नसतें, आवश्यकहि नसतें, व इष्टहि नसतें, म्हणून अधिक लिहीत नाहीं ]

' गोविंदाग्रज ' कविचतुरा । कलगीवरि तव ऐक तुरा ॥ धृ० ॥

" वेडा "[1] नच मी पुरा पुरा । परि मी वेडा खराखुरा ।
आहें वेडा खराखुरा । करि चतुरा म्हणुनीच तुरा ।
अर्थ मनाला मम बाणे । घेतो म्हणुनी तव गाणे ।
सवाल घेतों—तुरा करीतों—जवाब देतों,
' गोविंदाग्रज ' कविचतुरा । कलगीवरि तव ऐक तुरा ! ॥ १ ॥
झालें तुजला जें सखया । तेंचि जाहले जीवा या ।
पाहियलें जें त्वा नयनीं । स्मरतें ऐकुनि तेंच मनीं ।
म्याहि पाहिलें तेंच जरा । करि चतुरा म्हणुनीच तुरा ।
जबाब देतों—प्रेमें देतों—ऐक गड्या तो,
पटला जरि हा तुला जरा । तरि जमला मग खरा तुरा ' ॥ २ ॥

---

१. उत्तराकरितां श्री० ' गोविंदाग्रज ' ह्याच्या " कलगी "-तील जे शब्द घेतले आहेत ते दुहेरी अवतरणचिन्हांत घातले आहेत.

शोकापासुनि तू अपुलें । गाणें कवि रे, सुरु केलें ।
का र परि तू गाळियलें । आधीं त्याच्या जं झालें ? ।
एक वेळ "ची " आवडती " । "सारगी ' तव "जी होती" ।
प्रथम वाजली—सहज वाजली—कशी वाजली
नच कळता जें रवा करी । कां त्या स्थिति ती ग.ळियली ? ॥ ३ ॥
प्रथम वाजली सारगी । सारंगीपण ये अंगीं ।
साखर विरते दुग्धात । किंवा कापुर वाऱ्यात ।
जीव तसा विरला तींत । सारगीपण त्या येत ।
काय मौज ती—शांति घोर ती—शाति गोड ती,
कोण ह्मणे ' मी वर्णिन ती ' । शब्द जिथें सारे सरती ! ॥ ४ ॥
सद्गुण सर्वहि सहजाचे ते । कुकल्पना मन ना शिवते ।
ईश्वर आला करीं गमे । ' ईश्वर मीही ' हें वाणे ।
मनहि पूर्ण ये ताव्यात । श्वास यावया असमर्थ ।
जरी क्षोभलें—जरा पाहिलें—कीं तें शमलें,
बहार ऐशी वदू किती । नाहिं तयाला नाहिं मिती ! ॥ ५ ॥
आनदाविण मग काहीं । भानचि जीवाला नाहीं ।
कांहि घडो जगतीं बाह्य । अतरिं आनदचि होय ।
सुखदु.खे हीं मावळलीं । वृत्ती आनदचि झाली ।
सद्गुणनामा—वदली जिव्हा—तीन्हीं तेव्हां
तुफान आनदाचें ते । अतरिं गोड किती उठतें ! ॥ ६ ॥
शात पयोदधिचेंचि परी । वृत्ति राहते निरतरीं ।
काहीं घडतां बाहेरीं । शांत विचारा नित्य करी ।
निश्चय शीघ्र तशी करिते । गोंधळुनी नच बावरते ।

काल हा जसा—सूर्य वा जसा—मनुज तो तसा
चालत नित्याचि सयपणें । सारगीपण ज्या बाणे ॥ ७ ॥

बिंब उदेले हृदयिं असे । शांतीचा जें चंद्र असे ।
ज्ञानाचा परि सूर्य असे । जगतीं त्याला नाव नसे ।
सत्कृत्याच्या ताऱ्यांना । नित्य जन्म दे असताना ।
हृदयाकाशीं—रम्य उदेसी—प्रकाशराशी,
ज्ञानशांतिरविचंद्राला । जीव मोहुनी वश आला ॥ ८ ॥

सारंगी वा वीणाहि । अन्यहि बाना काहींही ।
नाव तयाला परि नाहीं । शांति '-वाचुनी अन्य मही ।
जीव सुखानें कळवळतो । शांतिमधें तो विरघळतो ।
काय मौज ती—काय शांति ती—केवि शांति ती
ठाउक जगता या नाही । अंधारीं जग सारेंहि ! ॥ ९ ॥

काय ठाउके तेव्हां की । ग्रहण येत त्या बिंबाही ।
राहू केतू कुणि आला । हाय, ग्रासितो बिंबाला ।
न कळे कोण अहो आला । क्रूर ग्रासितो बिंबाला ।
मौज मिळे ना—चित्त रमे ना—मग " करमे ना "
स्थिति ऐसी जीवा येत । शत मरणाहुनि दु खद ते ॥ १० ॥

नको हरी रे नको नको । कोणातेंही देउं नको ।
तशी स्थिती ती भयप्रदा । तीहुनि घोर नसे विपदा ! ।
' ढोल नगारे " मग ' भवतीं " । "नानापरि भेसुर रडतीं"
जीव उबगतो — जीव त्रासतो — जीव नको तो,
जीव परी तो जाई ना । चांडाळहि तो सोडी ना ! ॥ ११ ॥

उपाय हरले जीवाचे । भूत उगवरि न नाच ! ।
कितीहि झटना हटलें ना । काय करावें समजे ना ।
निमुटपण मग रडारडी । भाग मोसणे अशी घडी ! ।
डोकें शिणतें—चित्त भ्रमते—भूत परी ते
नाच उगवरि सोडी ना । जीवा क्षणभर करमे ना ! ॥ १२ ॥
अघोर वेळा ग्रहणाची । भूतपिशाच्चप्रेताची ।
सधि साधुनी हो, ' गगनीं । कृष्णभयंकर मेघानीं । "
" दाटी केली " छळायया । तुल जिवाच हरावया ।
सुख नेल हो—कुणि धावा हो—सुख तें या हो !
हि तुनी सुख नेलें हो ! धावा हो कुणि धावा हो ' ! ॥ १३ ॥
कोण धावतो साह्याला ? । जीव एकला राहिला ।
निराश होउनि बावरला । हताश रडतचि तो बसला ।
" स्वैरपण हृदयीं शिरले । मस्तक मेघानीं भरलें " ।
मन घाबरलें—बहु बावरलें "— अती " भटकलें, "
"कांहि सुचे ना, समजे ना" । रुचे न करमे "उमजे ना" ॥ १४ ॥
उदास तेव्हा जें वाटे । हताशता ती जी येते ।
डोकें तेव्हा जें फिरते । हृदय विदीर्ण जसें होतें ।
खिन्न किती तेव्हा वाटे । धगधग सर्वान्तर जळत !
अनुभवहीनां—घोर यातना—कधि कळती ना,
कितिही तुम्ही वर्णाना । चिता न ती समजेचि जना ! ॥ १५ ॥
" नाहिंपणाचा डोंगर तो " । जीवा सन्मुख मग दिसलो ।
जीव पाहुनी घाबरतो । अन्य बघाया कांहीं तो ।
अतिशय अतरिं तळमळतो । अति झटुनी तो धडपडतो ।
परी दिसे ना—कांहीं नयनां—नग हाले ना,
तोचि लमोनग दिसे पुढें । जीव एकला !—बघुनि रडे ! ॥ १६ ॥

पाहियलेंस हें उद्यान । पूर्णपणे तो नर जाणे ।
काय सौख्य निस्तेज खाणें । घरामध्ये जगता जळणें ! ।
विशीर्ण मग यातनासर्वे । तोचि " ओरडे दीर्घ रवें " ।
अरि मज मरणें—जळोनि मरणें—अखेर रडणें,
तरि सौख्य हें भोगु तरी । मन मोकळुनी रडू तरी ! ॥ १७ ॥
जरी एकला मी आहें । ऐसें जीवा गमताहे ।
तरि तो साक्षी सर्वांचा । त्राता दुर्बल दीनाचा ।
सर्व काल सन्निध आहे[1] । धारिष्ट्य करुनी पाहे ।
कसा लक्षिता—योग्य पाहता—करुणावंता
पान्हा फुटुनी तो निववी । पेटवि तो वणवा विझवी ॥ १८ ॥

[ २ ]

सांगिन आता नच पुढती । 'नको' म्हणे मम अल्प मति ।
विषय राहतो बाजूला । कथा पोंचते व्यक्तीला ।
उत्तर इतुकें पुरे गडे । काय सांगुनी याहिपुढे ? ।
मनासि गमलें—उत्तर दिधलें—त्वांहि ऐकिलें,
जरांहि पटलें तवान्तरा । तरि जमला मग खरा तुरा ॥ १९ ॥
आणिकही थोडें जाणे । परि नच नीट इथे वदणें ।
श्रोते भवती हे जमले । तमाशासि बघण्या आले ।
काय सांगुनी वा येथें । केवळ अंतरिं जें कळते? ।
म्याहि बोलिलें—त्वांहि ऐकिलें—अर्थ मिळाले,
झालें तें बरवें झाले । परी पुरे जितुकें झाले ॥ २० ॥

---

[1] सदा सर्वदा देव सन्नीध आहे । कृपाळूपणें अल्प धारिष्ट पाहे ॥
— श्रीसमर्थ.

गाणें गाता कलगीच । बोल बोलशी " सलगीचे " ।
सलगीनें सलगी पाडे । प्रेमाचे प्रमाण वाढे ।
मनही माझें उचबळे । ह्मणुनि बोल हे बोलियले ।
नव शब्दांही—आणिक काहीं—कथितों पाही,
मीहि बोलतो सलगीचें । उत्तर देतां कलगीचें ॥ २१ ॥

गृह माझे नाहींत भले । अजुनी "लग्न" नसे झालें ।
सोयरीक परि झालीसे । हर्ष मला याचाचि असे ।
भाग्य वाटते उगवेल । मंगल लग्नहि होईल ।
आहे तोवरि—मीहि कुमारी—" बाळ " रे परी
आधि मलाही झाले रे । कौमार्याचें मातेर ! ॥ २२ ॥

गिरिशिखरावरि जो बसला । बाल तोहि म्या पाहियला ।
मंजुल मृदु तो किति गातो ! । गोड किती ताना घेतो ! ।
गाणें ऐकुनि नर मरतो । इतुके मंजुळ तो गातो ! ।
धन्य मनुज ता—"बालक" बघतो—गान ऐकितो,
झाले ज्याच्या हृदयाचे । "मऊ" " मखमली" "गालीचे"॥ २३ ॥

जीवन गायनमय केलें । ' गोविंदाग्रज,' तू अपुलें ।
तोंवि गड्या रे तू "मेला" । " स्वप्रेतावरि "—ही बसला ।
ऐकुनि, सीमा नच ज्याला । इतुका हर्ष मला झाला ।
मीही झटतो—मधेच थकतो—पुन्हांहि झटतो
घडो साधण्या सौख्याची । स्वप्रेतावरि बसण्याची ॥ २४ ॥

उगाच जगतीं जे जगती । त्याहुनि नीटपणें मरती ।
ते नर मजला आवडती । ह्मणुनि तयाची यथामति ।

सेवा करणे धर्म वरा । करि चतुरा म्हणुनीच तुरा ।
जबाब दिधला—तुराहि केला—तुरा सपला,
लक्ष देउनी ऐक जरा । कालगीवरि हा तुझ्या तुरा ॥ २५ ॥
तुरा शोभतो रे चतुरां । तसा न शोभे तो इतरां ।
करिं तुजसाठीं म्हणुनि तुरा । 'गोविंदाग्रज' कविचतुरा ! ।
तुरा तुला हा समर्पितों । केवि खुले हरिखें बघतों ।
कसाहि असला—प्रेमे केला—शिरिं हा घाला,
'गोविंदाग्रज' कविचतुरा ! । केला कलगीवरीं तुरा ! ॥ २६ ॥

# *प्रारंभनमन.

( वृत्त—भुजंगप्रयात )

जरी " एकमेवाद्वितीया " नमावें ।
असें चित्ति इच्छा, कसें तें करावें ॥
तया एकमेवाद्वितीया नमीतां ।
नसे तो नमीता दुजाभाव जाता ॥ १ ॥
नमावें गमे सृष्टिच्या पालकाला ।
जयें हा स्वयें विश्वचित्राकृति केला ।
पुन्हा तो पुढें या जिथें आकळील ।
तिथें पूर्ण शांतीचि एकत्वशील ॥ २ ॥
तिन्ही या क्रिया तीन सत्वादिकांनीं ।
गुणांनी, घडे आलि माया जयानीं, ॥
करी जो कुणी, श्रेष्ठ सर्वांत तोच ।
अम्हां सृष्टमात्रासि तो "विश्वनाथ" ॥ ३ ॥
असें ' विश्वनाथत्व " अम्हासि पांहीं ।
तया एक साधेविणें प्राप्य नाहीं ॥
म्हणोनीच शास्त्रें सदा सांगताती
वृथा शक्ति टाकोनिया देवभक्ती ॥ ४ ॥
'अता " विश्वनाथें " असे सृष्टि केली ।
मनुष्यस्थिती आज ती प्राप्त झाली ॥
अम्हा येथुनी ब्रम्ह तें गम्य नोहे ।
म्हणोनी तुला वंदि मायापते ! हे ॥ ५ ॥

---

* ही प्रस्तुत लेखकानें केलेली अगदी पहिली कविता होय.

# *भोवऱ्याचा खेळ.

## प्रथम परिच्छेद.

(चाल—वधू ही बली.)

भोवरेवाला। जाउनी[1] कुठें तो लपला ॥ धृ० ॥
भोवरा फेंकिति एक गुणानें।
फेंकि भोवरा हा त्रिगुणानें।
कैसा फिरला तीन गुणानें।
बद्धहि न झाला,
ठरवितो सान हा काला ॥ १ ॥
कधीं फेंकिला, कुठुनि फेंकिला।
उभा कुठें तो तईं राहिला।
तीन गुणानीं कसा फिरविला।
प्रश्नमय झाला,
पाहुनी जीव ही लीला ॥ २ ॥

---

* ह्या कवितेचे एकंदर चार परिच्छेद व्हावयाचे, पैकीं तीन झाले आहेत. ह्यांतील पहिले दोन पूर्वी " काव्यकान्तार " नामक प्रस्तुत लेखकाच्या पुस्तकांत प्रसिद्ध झाले आहेत. पण तिसऱ्या परिच्छेदाचा संदर्भ कळण्यासाठीं ते येथें घ्यावे लागले

१. पाठभेद—" दावा हो कुणि तो मजला. " हें गाणें ज्यांना केवळ भक्तिपरच करून म्हणावेसें वाटेल त्यांस हा पाठभेद प्रिय वाटण्याजोगा वाटला म्हणून येथें दिला आहे

कशासाठिं हा तयें फिरविला ।
लीलेविण का न गमे त्याला ।
फेकुनि गमलें काय तयाला ।
हर्षयुत झाला,
        काय तो सुखें तैं इसला ॥ ३ ॥
कधिं न भोंवरा डळमळला हा ।
स्थिरगति राही नित्य कसा हा ।
स्थान कुठें खालीं भवऱ्या या ।
कुणी फेकीला,
        जाउनी कुठें तो लपला ॥ ४ ॥
जरि लपणें, का खेळ मांडिला ।
खेळ मांडिला, तरि कां लपला ।
खेळ सोडुनी का हो गेला ।
खचित का गेला,
        आपुल्या त्यजुनि खेळाला ॥ ५ ॥
भोंवरा न हा अजुनि थांबला ।
किति दिवसास्तव गति ही याला ।
जाइल गति जैं ही विलयाला ।
कुठें मग याला,
        स्थल असे स्वस्थ पडण्याला ॥ ६ ॥
पृथ्वि भोंवरा, चंद्र भोंवरा ।
तारा भवरा, सूर्य भोंवरा ।
भवहि भोंवरा, कर्म भोंवरा ।
भ्रमवि सकळांला,
        परि स्वयें अचल राहीला ॥ ७ ॥

[ २ ]

हिमालयाच्या शुभ्र शेखरीं ।
घोर तपस्या धीर जो करी ।
मोहि तयाला उमासुंदरी ।
तिला वश झाला,
दिसत का न तो आम्हांला ॥ ८ ॥

सीतेसाठीं वनें हिंडला ।
राजा होउनि पाळि जगाला ।
विरहें ज्याच्या दशरथ मेला ।
कुठें तो गेला,
सोडुनी दीन जगताला ॥ ९ ॥

बरा एकदां उखळिं बांधिला ।
उगा यशोदे, तुवा सोडिला ।
तुवा सोडिला म्हणुनि पळाला ।
अतां तो गेला,
घात त्वां यशोदे, केला ॥ १० ॥

गीता पार्थाप्रति जो वदला ।
मित्र सुदाम्याप्रतिही झाला ।
टाकुनि आम्हां दीन जनांला ।
अतां का गेला,
जो जगा तारण्या आला ॥ ११ ॥

म्हणति एकदां गोकुळिं आला ।
गोपीसंगें रास खेळला ।
टाकुनि कां हो आम्हां गेला ।
भाग्यहीनाला,
गोड तो कन्हैया लाला ॥ १२ ॥

[ ३ ]

भोंवरेवाल्या, थांब जरा रे ।
खेळ तुझा हा पाहूं दे रे ।
कसा खेळ हा, कसे भोंवरे ।
याहि नयनांला,
        पाहु दे चंक्र ही लीला ॥ १३ ॥
खेळ भोंवतीं सर्व चालला ।
न कळे भोंवरा, न कळे लीला ।
नवल सकल हें नयनमनांला[1] ।
खेळ खेळीला,
        खेळाडू परि तो लपला ॥ १४ ॥
विश्वाचा हा खेळ चालला ।
हसवी कोणा, रडवि कुणाला ।
आदिहि नाहीं, अंत न याला ।
करी ही लीला,
        कोण हें असें खेळीला ॥ १५ ॥
विश्वपाळण्या झोंके देई ।
दिसते नच हो परि ती आई ।
पाळणा परी झोंके घेई ।
तया मातेला,
        भेटवा कुणी या बाला ॥ १६ ॥
वृक्षाल्यगीं दोल बांधिला ।
दिसेनाचसा वृक्ष जाहला ।

---

१. नयन व मन ह्यांना.

झोके परि येती दोलाला ।
कुठें बांधीला,
    वृक्ष तो काय हो झाला ॥ १७ ॥

[ ४ ]

म्हणती शब्दातीत राहिला ।
स्वयेंचि नच का शब्द जाहला ।
आपण अपुले अतीत झाला ।
कसा हो झाला,
    सांगा हो कशि ही लीला ॥ १८ ॥
कुणी मानिली या सहचारिणी ।
माया नामें विश्वकारिणी ।
दोघे निर्मिति, अनादि दोन्ही ।
अनादी कैसे,
    दोघेही नकळे मजला ॥ १९ ॥
कुणी बोलती मूर्त निराळा ।
तटस्थ आपण दुजा राहिला ।
गती तेथुनी दे विश्वाला ।
कुठें राहीला,
    चाळितो केविं सूत्रांला ॥ २० ॥
कुणी म्हणे तो स्वयेंचि नटला ।
स्वयें भोवरा स्वयेंचि लीला ।
स्वयेंचि गुणही, स्वयें फिरविला ।
कशी ही लीला,
    कोण हें केविं खेळीला ॥ २१ ॥

---

# द्वितीय परिच्छेद

( चाल—वधु ही चली. )

भोवरेवाला । खेळात गर्क हा झाला ॥ ध्रु० ॥
जें जें आहे तें तें झाला ।
पूर्णरूपें आम्हां दिसला ।
तरि तो आम्हां वाटे लपला ।
मनुजबुद्धीला,
चकवितो भोवरेवाला ॥ १ ॥
अस्तित्वाची भूमी केली ।
स्थलक्षण त्यावरि वाळु टाकिली ।
काल-जवनिका[1] वरी सोडिली ।
फेकि भवऱ्याला,
पटसन्मुख भवरा आला ॥ २ ॥
भवरा आला, खेळहि दिसला ।
नानापरिनें फिरुनि खेळला ।
एकचि नानापरिनें रमला ।
फिरुनि तो येला,
नाहिंसा भोवरा झाला ॥ ३ ॥
भवरा जातो पटामागुती ।
न कळे आम्हां मग त्याची स्थिति ।
आपण आहे पटामागुती ।
ओढि भवऱ्याला,
पट सारुनि भवरा गेला ॥ ४ ॥

---

१ नाटकाचा पडदा.

[ २ ]

आपण प्राची, रविही सजला ।
उंच पर्वती सानु जाहला ।
तेथुनि उदया पाहे अपुल्या ।
असी नटलेला,
        खेळतो भोवरेवाला ॥ ५ ॥

प्रकाश झाला, छाया झाला ।
वस्तु ठेविली मधें मजेला ।
रवि धावे धरण्या छायेला ।
लपंडावाला,
        खेळतो भोवरेवाला ॥ ६ ॥

तारे जळुनी रवि तो होतो ।
रवि फुटुनी तो तारे नटतो ।
भासवि आम्हां कीं मी जातों ' ।
मगनें परी राही,
        चकवुनी भोवरेवाला ॥ ७ ॥

गगनपटावरि चंद्र चित्रितो ।
त्याहि पुसितो, पुन्हां काढितो ।
लहान-मोठा पुन्हां रेखितो ।
निश्चिय न झाला,
        भासवी भोवरेवाला ॥ ८ ॥

जडाघडारा आधिं निर्मिलें ।
चैतन्याचे दिवे उजळिले
लहान-मोठे त्यांतहि केले ।
दिवाळी खेळे,
        रंगेल भोवरेवाला ॥ ९ ॥

[ ९ ]

प्रेमाकर्षण दोरा केला ।
विश्वाचा या पतंग केला ।
आकाशीं तो उंच उडविला ।
तळीं राहीला,
स्मितमुखी भोंवरेवाला ॥ १० ॥

सृष्टिवन्हि तो स्वयेंचि झाला ।
सृष्टिवन्हिचें इंधन झाला ।
क्रिया ज्वलन जी तीही झाला ।
पेटवी त्याला,
फुंकुनी भोंवरेवाला ॥ ११ ॥

विश्वमृगजल रवि तो झाला ।
मृगजलरूपें तोचि भासला ।
फसे मृगजला मृग तो झाला ।
मौज बघण्याला,
साक्षीहि भोंवरेवाला ॥ १२ ॥

[ ३ ]

भोंवरेवला कसा खेळला ।
मती कल्पितां कुंठे त्याला ।
बघता बघता भ्रम चित्ताला ।
कठिण ही लीला,
एकला सहज खेळला ॥ १३ ॥

'अनादि' म्हणता 'आदि' न त्याला
'आहे' म्हणतां 'आदि' लागला
'आदि' वाचुनी 'आहे' झाला ।
अशी ही लीला,
एकला तोचि खेळला ॥ १४ ॥

कालाविण आरंभ तयाला ।
आरंभाविण ' आहे ' झाला ।
असुनी स्थित्यंतर नच त्याला ।
काळ कालाला,
गारूड अशी ही लीला ॥ १५ ॥

दिशेपलिकडे दूर पसरला ।
स्थलासिही आधार जाहला ।
स्थलाविणें तो स्वयें राहिला ।
सजते त्याला,
ही अशी गारुडी लीला ॥ १६ ॥

छळें जग च्या जगा झाला ।
किंवा कळुनी मनिं जो विटला ।
या जगताच्या फोलपणाला ।
अशा मनुजाला,
विश्रांति भोंवरेवाला ॥ १७ ॥

---

## तृतीय परिच्छेद.

( चाल—बघू हे वर्मा )

भोंवरेवाला । विश्रांत केंद्र या झाला ॥ धृ० ॥
भोंवरेवाला हृदया झाला
विश्रांतीचें स्थान जयाला
भासतसे तन्मग्नमनाला ।
भोंवरेवाला,
विश्रांत भ्रांत सरलेला ॥ १ ॥

दिसें बाहिरी तें जरि झाला ।
आतांहि आहे परि भरलेला ।
केवळ नाहीं अंतरिं भरला ।
केंद्रही झाला,
विश्वांत भोवरेवाला ॥ २ ॥

विश्वाचा हा व्याप मांडिला ।
एकाचि तो हें सगळें झाला ।
शक्ति परी ह्याच्या चलनाला ।
तीहि तो झाला,
शक्तिचें केंद्रही बनला ॥ ३ ॥

केंद्रपणानें सूत्र हालवी ।
शक्तिपणानें तें तें करवी ।
विश्वपणानें तें तें होई ।
अशा खेळाला,
खेळतो भोवरेवाला ॥ ४ ॥

विश्वपणानें परि जरि होई ।
शक्तिपणानें जरि तो करवी ।
केंद्रपणानें परि तो ठरवी ।
ठरवि कार्याला,
तो केंद्र भोवरेवाला ॥ ५ ॥

[ २ ]

सरोवरामाधि खडा टाकिला ।
तरंग गोलाकृति तरि सलिला ।
पसराति हलुहळू ते तीराला ।
तिथं परि स्फुरला,
केंद्रांत भोवरेवाला ॥ ६ ॥

या ग्रहमालांच्या मध्याला ।
लंबवर्तुलाकृति मागीला ।
एक केंद्र जरि सूर्य जाहला ।
अन्य जो उरला,
तो केंद्र भोंवरेवाला ॥ ७ ॥

सूर्य जसा या ग्रहमालेला ।
ग्रहमालांच्या, जी, मालेला--।
तशी केंद्र झाली रविमाला ।
तिच्या केंद्राला,
शेवटीं भोंवरेवाला ॥ ८ ॥

सुंदर कोमल फूल उमललें ।
केंद्र धरोनी उकलत गेलें ।
केसरशयनीं तिथें पहुडलें ।
रूप तें कवळें,--
तो श्याम भोंवरेवाला ॥ ९ ॥

विश्वचें या फूल उमललें ।
कोंद्र धरोनी उकलें, खेळें ।
गंधरूपधन भरुनि माजलें ।
तया केंद्राला,
पहुडला भोंवरेवाला ॥ १० ॥

जडदेहाचा वाडा केला ।
लिंगदेह ही पेटी त्याला ।
कारणकापसांत वेष्टिला ।
आत लपवीला,
तो हिरा भोंवरेवाला ॥ ११ ॥

विश्वाचा या वाडा केला ।
सत्यलोक हा पेटी झाला ।
प्रकृतीचा कापूस वेष्टिला ।
आत लपवीला,
तो हिरा भोवरेवाला ॥ १२ ॥

अणुरेणूंच्या डब्या धाकुल्या ।
प्रकृतिद्रव्यें पूर्ण भरियल्या ।
विश्वीं साऱ्या उधळुनि दिधल्या ।
आंत लपवीला,
हिरकणी भोवरेवाला ॥ १३ ॥

तुडुंब भरुनी नदि नित चाले ।
कुठ भोवरे मधें जाहले ।
गोल तिथें तें जल नित घोळे ।
परी केंद्राला,
खेळतो भोवरेवाला ॥ १४ ॥

चैतन्याचा प्रवाह चाले ।
मन हे भवरें मधें जाहले ।
धिकारजल हें भ्रमू लागलें ।
परी केंद्राला,
खेळतो भोवरेवाला ॥ १५ ॥

विश्वाचा ह्या प्रवाह चाले ।
ब्रम्हांडांचे भवरे पडले ।
सूर्य नभाचे केंद्र जाहले ।
त्या सूर्यांना,
केंद्र तो भोवरेवाला ॥ १६ ॥

प्रकृतीचा हा सिंधु उसळला ।
विश्वाचा हा भवरा पडला ।
कोठं कुठें तो अदृश्य झाला ।
परी केंद्राला,
खेळतो भोवरेवाला ॥ १७ ॥

सु‍टे वावटळ ही विश्वाची ।
अनंत काळीं फिरे गोल ही ।
परी वावटळ फिरविलि साची ।
वायु तो झाला,
धूळीहि भोवरेवाला ॥ १८ ॥

[ २ ]

सौंदर्यांतुनी मार्गे दिसतो ।
विशाल जें जें त्यांत भासतो ।
उदात्तांतुनी बोलुं पाहतो ।
कवळुं जणुं आला,
प्रेमांत भोवरेवाला ॥ १९ ॥

कशांतही तो स्वस्थ न बसतो ।
बाहिर येण्या आतुनि झटतो ।
व्यक्त व्हावया यत्न करीतो ।
परी कुणि केला,
हा बद्ध भोवरेवाला ॥ २० ॥

व्यक्तत्वाची धडपड त्याची ।
चालकशक्ती ती विश्वाची ।
विश्वाच्या या घडामोडिची ।
होंचे करण्याला,
जाउनी आंत जणुं लपला ॥ २१ ॥

आत नित्य तो स्फुरण पावतो ।
स्फुरणें आतुनि तो घडवीतो ।
उत्पत्तिस्थितिलय सगळे तो ।
हेंचि करण्याला,
जाउनी आंत तो लपला ॥ २२ ॥

अनत कल्पें सर्वांचि झाला ।
तरि " होण्याची " तृप्ति न त्याला ।
अनंत आहे, अनंत " झाला " ।
तरी सजलेला,
तो पुन्हां विश्वि " व्हायाला " ॥ २३ ॥

" होणें " बरवें अधिक वठावें ।
याविण दुसरें जणुं नच ठावें--।
असें वागतो, काय म्हणावें ।
केविं हा झाला,
हें असें वेड जडलेला ॥ २४ ॥

वेड्या,--वेड्या भोवरेवाल्या ।
कोणी तुजला आंत कोंडिला ।
वेड कसें रे जडलें तुजला ।
मत्त हा झाला,
बोलतो न; लपुनी बसला ॥ २५ ॥

रे रे वेड्या भोवरेवाल्या ।
तूं न एकला वेडा झाला ।
वेड लाविलें त्वां विश्वाला ।
विश्व तूं झाला,
वेडही घेउनी आला ॥ २६ ॥

व्यक्तत्वें वेड लागलें ।
कांहीं दिसलें, कांहीं लपलें ।
" दिसलें " शोधित जें " लपलेलें ।
अंश लपलेला,
        धडपडे तोहि दिसण्याला ॥ २७ ॥

काय हरी हा खेळ मांडिला ।
नांवचि नाहीं या खेळाला ।
वेडा करिही बघणाराला ।
भोंवरेवाला,
        वेडात केंद्रही झाला ॥ २८ ॥

व्यक्तत्वाच्या, व्यक्तित्वाच्या ।
अपूर्णतेच्या, पूर्णपणाच्या ।
तसेंच, लपुनी नित असण्याच्या ।
सर्व वेडाला,
        केंद्र तो भोंवरेवाला ॥ २९ ॥

दोन खुळ्यांना विश्व चाललें ।
अपूर्ण व्यक्तत्वाचें पहिलें ।
पूर्णत्वाचें मग जडलेलें ।
दोन्हि वेडाला,
        केंद्रान भोंवरेवाला ॥ ३० ॥

आतुनि पसरें एक बाहिरा ।
दुसर परत फिरुनि तें घरां ।
नित्य चालना वाट यापरां ।
भोंवरेवाला,
        नित्य हा प्रवासी झाला ॥ ३१ ॥

[ ४ ]

धुळींत भरला, कधि थकलेला ।
कधीं प्रभातीं उठुनि चालला ।
परी ओळखी जो नित त्याला ।
त्या जीवाला,
सापडे भोवरेघाला ॥ ३२ ॥
विचारांतही केंद्र जाहला ।
अन्तःकरणीं केंद्रचि बनला ।
क्रियेंतही तो केंद्र राखिला ।
अशा पांथाला,
सांगाति भोवरेघाला ॥ ३३ ॥

---

# अनंताचें ढोंग.

( चाल—फटक्याची. )

मायेच्या या अंधारामधिं, अनंत लपुनी नित फिरसी ।
कुठें कुणाला कुठें कुणाला उगिच झाखला कधिं दिसतो ॥ धृ० ॥

काय अनंता ! ढोंग मांडिलें कशासि लपनाछिपणी ही ।
काय तुझें तें रूप मनोहर योग्य जगा बघण्या नाहीं ॥
किंवा जगतचि योग्य नसे हें अनुपम रूप तुझें बघण्या ।
आहे तरि रे काय, कळे ना, लपनाछिपणी संपे ना ॥
नित्यचि राहे खेळ असा हा – शाश्वत आहे हा. क्रिया ।
तूंच स्वुषानें क्षणभर हा रे, सर्व मांडिला कां माया ॥

मायेच्या या निबिड काननीं अनंत लपले जागोजागीं ।
परि गवसे ना; अंधळी कोशिंबिर ही सुरुं झाली ऐसी ॥ १ ॥
मायेच्या या निबिड काननीं अनंत लपला जागोजागीं ।
प्रतिवृक्षाच्या स्कंधामागें प्रतिपुष्करिणीतटभागीं ॥
पानीं पानीं लपोनि बसला, वनांत साऱ्या आनंद ।
मायेचा हा सखा खेळतो खेळ आज हा गोविंद ॥
गोविंदें हा खेळ मांडिला, लपनाछिपणी डाव धरी ।
अनंत सान्तें शोधुं लागलीं परस्परातें परोपरीं ॥
एकामेकांमधें राहतां एकामेकां हुडकीतीं ।
मायेच्या या गोड काननीं खेळाची ही अशि रीती ॥ २ ॥
मायेच्या या निबिड काननीं एकामेकां हुडकीतां ।
पाय चोरटे हळूं टाकितां, चहाळ थांबोनी घेतां ॥
एकामेकां हाक मारितां हळूंच, म्हणतां " ये इकडे ।
तूं मी मिळुनी तुला शोधुं या, साह्य कराया येइ गडे ! " ॥
अंधारामाधें, वनात हिंडता, नित्य बोलतां हळूं हळूं ।
कोमल शब्दहि वनांत धुमतो, वनीं ऐकती सर्व तरू ॥
चहाळ नित्यचि ऐकूं येता एकामेकां दुसऱ्याचा ।
मायेच्या या चित्रकाननीं योग न ये परि भेटीचा ! ॥ ३ ॥
मायेच्या या गहन काननी खेळ मजेचा सुरुं झाला ।
अनत खेळे, माया खेळे, काय तोड त्या खेळाला ! ॥
खेळ खेळतां चुकुनी होई भेट न, भासवि जगताला ।
अनत वाछी तरी न होई ? काय वेळ मग भेटीला ? ॥
अनंत वाछी की नच वांछी हेंचि कळेना सान्ताला ।
सान्ताचे हो काय चालतें ? अनंत खेळी जोडीला ॥

खेळ परी हा मुळ संपे ना, थके न, किंवा कळेहि ना ।
मायेच्या या गहन काननी जीवशिवाचा धिंगाणा ! ॥ ४ ॥
मायेच्या या गहन काननीं सहज लपत तूं फिरशी कीं ।
कांहीं कारण असे तयाला ? भाग तुला कुणि पाडी कीं ? ॥
हें तव फिरणें लपणें भासें, लपणें परी हें आहे का ? ।
की भेटीची हीच रीत बा, तुझ्या जगांतिल आहे का ? ॥
हीच तयारी किंवा पुढिल्या भेटीसाठी आहे का ? ।
मधेंच लपणें, हळूंच दिसणें, काय अनंता हा हेका ! ॥
याविण दुसरी तुज खेळाची रीत ठाउकी नाहीं का ? ।
मायेच्या या शांत काननीं अनंत परि हा धरि हेका ॥ ५ ॥

[ २ ]

मायेच्या या चित्र काननी अनंत ढोंगें अती करी ।
लपनाछिपणी खेळाया त्या ढोंगाविण ना गति दुसरी ॥
गरिब बिचाऱ्या सान्तालागीं ठकावयातें यत्न करी ।
अदृश्य रूपें आत राहुनी नित्य भासवी असे दुरी ॥
अदृश्यतेचें नीलदुकुल हे लपट्टुनि लपतो हा तिमिरा ।
हळूच शिरुनी कुठेंहि बसतो मायेच्या मग अंधारा ॥
सान्ताची जरि दृष्टी चुकली,–अदृश्य जवळचि,–मौजेनें ।
मायेच्या या शांत वनीं मग, अनंत हसतो मोठ्यानें ! ॥ ६ ॥
मायावनि या ढोंग कैसा पहा करी तो परोपरी ।
अनंत जो त्या मरण कसें हो ?–शक्य कसे हे असे तरी ? ॥
परी 'मरें मी' नित्य भासवी सांन्तामधुनी पळतांना ।
कोठुनि आणिला बुरखा तूं हा चुकवी सर्वांच्या नयनां ॥
पांघरुनी जो पळूनी जातां दिससि न केव्हांही कवणा ।
असे कशाचा गेड बनविला ? शिवला कोणी ? सांगे ना ! ॥

उघड्या तोंडें का न खळसी ?-बुरख्यातें या झुगारुन ।
मायेच्या या चित्रवर्णा परि बुरख्याला ये बहु मान ! ॥ ७ ॥
बुरख्यावाचुनि पाय न टाकी, काय वेड हें बुरख्याचें ! ।
पडदे जणु हे सर्व सोडिले नाटक करण्या विश्वाचें ॥
एका एका पड्यामागें पुन्हां पुन्हां हा शिरताहे ।
एकचि नट हा अनेक पात्रे होउनियां बोलत राहे ॥
पड्यामागुनि नव्या येत तैं नट हा फिरुनी नव भासे ।
ढोंगचि सगळे ! एकचि बुरखा, एकचि नटही हा आहे ॥
परी शिताफी करुनी फसवी, रडण्याचि अवघे लबाडिचें ।
काय, अनंता, गोंधळ घालुनि ऐसी मौज तुला वाटे ? ॥ ८ ॥
उषःकालिंचें तेज उषेचें, धनाधिकारहि तो होतो ।
शरदृतूंतिल रात्र रुपेरी, वैशाखाचें ऊन्हहि तो ॥
तुटला काळा कडा भयंकर, तसाचि सुमनहि कोमल तो ।
रूपवतीचें रूप जसा तो, स्मशानिं धूकहि तो बनतो ॥
वीरांचें खर खड्ग तसा तो अश्रु चोरटा तरुणीचा ।
मत्त नृपाचें हास्य तसा तो आर्तस्वरही दीनांचा ॥
खेळ करोनी, ढोंगें सोंगें इतुकीं सारीं करोनिही ।
ज्या नच कळतो तया हासण्या पुन्हा मोकळा तो राही ! ॥ ९ ॥
दिसे प्रकाशी फक्त भासवी, जाउनि लपतो मग तिमिरीं ।
व्याघ्राच्या नयनांतुनि बघतो स्वतासि मग तो अंधारीं ! ॥
ढोंग करी कीं गोटे, निर्घृण, माती निर्जिव ही तैसी ।
त्याच मातिनें सजीव वृक्षां पहा पुढें मग हा पोसी ! ॥
गोटे चुरुनी माती करुनी बागबगीचे उठवितो ।
गोट्यांच्या वंशांतिल बागा दाखवुनी हा भुलवीतो ! ॥

सजींव पोशी निर्जिव घेउनि, सजीव निर्जिव दोन तरी - ।
नित्य भासवी, फसवाफसवी काय याहुनी जगीं दुसरी ? ॥ १० ॥
साली, पानें, मुळें, कांहिं तरि घालुनियां मनुजा जठरीं ।
मेंदूपाशीं नेउनि त्यांचे विचार चिन्मय नित्य करी ! ॥
एकाच्या शिरिं शिरोनि बनतो विचार सुंदर काव्याचे ।
तोचि शिरोनी शिरीं दुजाच्या विचार बनतो सूडाचे ! ॥
पाला होतो विचार कैसा ? मजला किमिया सांगा हो ।
किमिया कैची !--नजरबंदि ही, ठकबाजीची युक्ति हो ! ॥
खनिज खाउनि उद्भिज जगतें, उद्भिज खाउनिया प्राणी ।
प्राणिहि प्राण्या खाऊं लागले ! परी अचंबा करि न कुणी ! ॥११॥
सजीव उद्भिज, सजीव प्राणी, सजीव मानवही आहे ।
' जीव ' तरी हे इतुके झाले कैसे ? मजला न कळे हें ॥
' जिवंत असणें ' एकचि असतां अनेक त्यातें भासवितो ।
नयनीं टाकुनि धूळ पहा हा उगा जगाला फसवीतो ॥
जिवंत असणें एक नसे तरि, भिन्न तरी झालें कैसें ? ।
भिन्न नसे तरि, एक असोनी अनेक भासें कां ऐसें ? ॥
तुझिच लबाडी आहे सारी गमतें मजला यांतूनि, ।
काहिं तरि कैसें तरि भासवि, हसतो कोणि गालांत ॥ १२ ॥
बुरखा, बा रे, बुरखा सारा, बुरख्याची ही करामत ! ।
खनिज वेगळे भासवुनीयां चोरुनि शिरतो वृक्षांत ॥
' वृक्षजाति ही सर्व वेगळी ' भासवुनी बुरखा घेतो ।
पाय चोरटे टाकुनि पळतो, हळूंच प्राण्यामाधि शिरतो ॥
प्राण्यामाजी पुन्हा ' मूढ मी, काही मजला उमजे ना '- ।
दाखवि ढोंगें; बुरखा घेई, तेथुनि हलके पळे पुन्हा ॥

मनुजामाजीं पुन्हां उमटला ! नीट शहाणा दिसताहे ।
उगाच दुर्गुण भलते करितो, रडे पडे, दुःखित राहे ! ॥ १३ ॥
" दुःखाचें "—मग म्हणतो—" कारण आतां कळलें मजलागी ।
बाह्य जगाच्या रूपें मी जो पळतों त्याच्यामागें मी ! ॥
हेंच असे कारण मम दुःखा ! " निमित्त ऐसें ह्या सागे ।
" ज्ञान अतां मिळवीन " म्हणोनी ज्ञानामागें मग लागे ॥
ज्ञान काय तें ऐका आतां, ' ज्ञान ' हि त्याचें गमतीचें ।
म्हणे " कोण मी कळलें आतां ! "—' ज्ञान ' गरजतें जें तें हें ! ॥
अंतचि नाहीं त्याच्या ढोंगा, ढोंगासाठीं जणुं जन्मे ।
अंताचि नाहीं ढोंगा म्हणुनिच अनंत म्हणती का तूतें ? ॥ १४ ॥

[ ३ ]

मायावनिचीं ढोंगे त्याचीं सांगू कैसी, किती तरी ।
नरदेहातें घडवुनि हालें येउनि राहे तयान्तरीं ॥
झोप कशाची अनंत जो त्या ? झोपेचे परि ढोंग करी ।
" झोप येतसे मला " म्हणे, ह्या खराचि निजतो घरेवरी ! ॥
" आतां निजतों " म्हणे, लावितो डोळे, निजतो खरोखरी ! ।
काय ढोंग हो पहा भयंकर ! अनंत निजतो कधीं तरी ? ॥
ऐसीं ढोंगें परी करीतो, खंतहि त्याला नाहीं हो ।
कुणी ओळखी, हसतो अणखी, लाजहि त्याला नाहीं हो ! ॥ १५ ॥
पृथ्वी घडिली गोल तयानें, जीव पेरिले सर्वेकडे ।
आकाशामधि फेकुनि दिधली, काय, बघे ना, घडे पुढें ॥
पायानें हे सगळे चिकटति घरोसि, म्हणती " वरती मी " ।
परस्पराच्या उलट मजुला सर्वचि सरके ! बहु नामी ! ॥
नभ सर्वांना दिसे शिरावरि, ' मी सरका ' सर्वां वाटे ।
काय टवाळी उगी अनंता ! जगताची ही करिसी रे ! ॥

कामधाम राहिले, सर्व संसार वाट पाहे ।
उठुनि प्रभातीं हरि परि हृदयीं गातचि बसलाहे ! ॥
लहर तुझी ! तूं राजा माझा, गाइ सुखें श्रीहरी ।
संसाराचें काहिहि होवो, प्रसन्न हो तूं तरी ! ॥
राज्य तुझें हें; मृदु नादांचा उडवि सुखें कहर ।
वाणीच्या वेलीस यो सुखें कवितेचा बहर ॥ १ ॥
काय हरी, तूं अशाच गोपी कुंजवनीं अडविल्या ? ।
कामधाम संसार पहाटे टाकुनियां आल्या ॥
प्रभातकाळीं प्रभु वनमाळी वाजवितो मुरली ।
तरूतळीं त्या गोपी बसल्या, शुद्ध कुणा नुरली ॥
क्षण मौजेचे, अति सौख्याचे, त्यांनीं अनुभविले ।
तेंच द्यावया सुख मज हरि, का गाणें हें केलें ? ॥ २ ॥
हृदयाची या आसहि दुसरी कांहिं जगीं नाहीं ।
त्वां गावें, म्यां श्रवण करावें, गावे गा, मीही ॥
गाइ सुखानें, गाइ श्रीहरी, गाइ जगन्मंगला ।
नाहीं औषध जगीं श्रीहरी, गोड तुझ्या लहरिला ॥
लहरीनें तूं गाता श्रीहरि, सौख्य जगा होवो ।
जगा न झाले, जीवा माझ्या !— मला तरी लाहो ॥ ३ ॥
नच ऐकिशि तूं; कामधाम मम सर्वहि त्वा बुडविलें ।
उठुनि पहाटे हरि रे, हट्टें मजला तूं अडविलें ॥
अडिव, अडिव, तूं, तुझें अडविणें हेंचि गोड वाटे ।
संसाराचें काम सदाचें, पाय तुझे गोमटे— ॥
अर्धीच दिसगें कठिण, त्यातुनी प्रेमें त्वां अडविणें— ।
हें तों श्रीहरि, कधीं तरी रे, सद्भाग्यें घडणें ! ॥ ४ ॥

करुनि टवाळी देतो टाळी मायेच्या हातावरती ।
अनंत-माया खेळूं बसली पाड जिवाचा तिथे किती ! ॥ १६ ॥
तूंच घडियल्या जीवाची कां विडंबना ऐसी करिसी ? ।
तूंच घडविल्या जीवाची तुज विडंबना रुचते कैसी ? ॥
निर्बल जीवें काय करावें ? अम्ही सर्व हें दुःख गिळूं ।
कधि अज्ञानें, कधि तें ज्ञानें, अम्ही तुझेसंव वनिं खेळूं ॥
एकांगी परि खेळ असे हा, जोडी आम्हि न खेळाला ।
परि मी भ्रमलों -- जोडी आम्हि नच, माया तुजला जोडीला ॥
अम्हि खेळातिल चूकभूल, वा प्रश्न परस्पर जे पुशिले ।
तुम्हीं खेळतां, अमुच्या रूपें प्रकट जणों वा, ते झाले ॥ १७ ॥
किंवा केले डाव चतुर जे परस्परावरतीं तुम्हीं ।
तेच प्रकटलों दृश्यमात्र हे विश्वातिल सारे आम्ही ॥
तुमचें फिरणें, तें नाचणें, मसलत करणें दुसऱ्याशी ।
निहाळुनी अंधारीं बघणें, हळूं बोलणें चित्ताशीं ॥
तीं हीं आम्ही प्रकट जहालों गती, चेतना, जड, किंवा ।
नांव सुखानें करुनि कशाचें वेड लागलें जें विश्वा ॥
हे सुकुमारा करुणागारा ! निराकार विश्वाकारा ! ।
खेळ, खेळवी विनोदवीपिनीं तुझ्याचि आम्हां साकारा ! ॥ १८ ॥

---

# श्रीरंगाची लहर.

[ चाल—भूपाळी.—"घन श्याम सुंदरा" ]

उठुनि प्रभातीं कुठुनी ये तुज गाण्याची लहर ? — ।
हृदयस्था गोविंदा, उडवी गाण्याचा बहर ॥ ध्रु० ॥

सद्भाग्यानें आज हरीनें मजलागीं अडविलें ।
हृदयानें ह्या हरिनें बसुनी गाउनि दाखविलें ॥
सौख्य न माझें मला सागवें, वेडा मजला म्हणा ।
वेडा असलों तरी ऐकुं या श्रीहरिच्या गाना ॥
वेडाची मज लाज न वाटे वेडासेंच जरि हरी— ।
गातां ऐकू येई तरि मग वेडचि बरवें तरी ॥ ५ ॥
गातां गातां श्रीहरि हृदयां हर्षानें मातला ।
हर्षचि त्याचा वेड म्हणोनी माझें हें दिसला ॥
वेडा श्रीहरि गोड किती तो शहाण्या हरिहूनिही ।
हे तों दुःखी, दीन, जगाला माहितही नाहीं ! ॥
वेड तयाचें ' सूर, ' त्यावरी ' गाणें ' मम वेड हें ।
लय लागो रे, खरी म्हणुनें हरि, चित्त तळमळे हें ॥ ६ ॥

---

# घाबरलेलें पाखरूं.

( चाल—वधू ही वर्ला )

वृक्ष अति हाले । पाखरूं घाबरें झालें ॥ धृ० ॥
वारे सुटती अति जोराचे ।
सकल वृक्ष तो थयथय नाचे ।
वृक्ष न थांबे सुख मग कैचें ।
त्रस्त तें झालें,
वृक्ष तो सतत हो हाले ॥ १ ॥
विश्रान्ती नाहीं घरट्याला ।
घरट्यासंगे त्या पक्ष्याला ।

शोकें बहुनी जीव उबगला ।
कोण परि बोला,
        थांबवी वृक्ष जो डोले ॥ २ ॥
उडतां ये ना, कांहीं दिसे ना ।
घरट्याचेंही दार सुचे ना ।
वृक्ष हले तो परि थांबे ना ।
वृत्ति हो दीना,
        उबगला बाल खगराणा ॥ ३ ॥
म्हणे " गरुड तो तात जयाचा ।
बाळ खचित मी काय तयाचा ।
विश्वामाजी प्रताप ज्याचा ।
काय मी केलें,
    —जगुनि, हें क्षुद्रप जरि हाले" ॥ ४ ॥
स्व-तात गरुडा स्मरूं लागले ।
सामर्थ्यावरि ध्यान लाविलें ।
सामर्थ्यहि थोडकें उतरलें ।
" क्षुद्रप " परि हाले,
        पुनरपी प्रश्न तें झालें ॥ ५ ॥
गरुडातें मग तयें प्रार्थिलें ।
" स्वतांचि या हो " म्हणुनि बाहिलें ।
गरुडें तें श्रीहरीस कथिलें ।
श्रीहरी द्रवले,
        यावया सज्ज ते झाले ॥ ६ ॥
श्रीहरि आले ! श्रीहरि आले !! ।
वारे सगळे नाहिंच झाले ।

जिकडे तिकडे शांत आहलें ।
झुडप स्थिर झालें,
पाखरूं सुखा तें झालें ! ॥ ७ ॥

## हा कोण ?

[ वृत्त.— शार्दूलविक्रीडित. ]

येवोनी हृदयांत आंत दडुनी झाकोनियां राहिला ।
माताताडनभीत बाल लपुनी आहे जसा बैसला ॥
रूपानें सुकुमार फार, कवळा, मोही बघे त्याजला ।
बाला ! भीसि कुणास ? कां लपसि गा ? तूं कोण रे, कोठला ? ॥१॥
माझे गेहिं कशासि तूं लपुनिया येवोनिया राहिला ? ।
मी तों नेणत कोण तूं, तुज कसा आश्रय हा वाटला ? ॥
गाठी केविं जगांत या पडत हे कोणा कळाले असे ? ।
बाला ! खेळसि कां न अंगणिं सुखें माझ्या अतां गोडसें ? ॥ २ ॥
नाहीं का भय लोपलें अजुनिही ? कोणास भीसी तरी ? ।
हा ! हा ! काय नृशंस हें जगत हो !--भ्यावीं मुलें अन्तरीं ? ॥
हे बाला ! सुकुमार ! मोहन ! सख्या ! रम्यानना ! लालना ! ।
केव्हां तूं वदशील गोड वचना मोहावया मन्मना ? ॥ ३ ॥
केव्हां नूपुरनादिता करुनियां नृत्या मनीं हर्षसी ? ।
केव्हां खेळुनि अंगणीं जगतिं या आनंद तूं वर्षसी ? ॥
पाहूं वाट किती ? तुला सुकुमरा ! कैसें तिथे बैसवे ? ।
एकाकी म्हणूनीहि कांहि न गमे ? हें बाल कैसें नवें ? ॥ ४ ॥

# सावळा चोर.

( वृत्त — मालिनी )

अवनितलविहारी कामिनीमोहकारी ।
रजतधवल सारी चंद्रिका मोहणारी ॥
पसरुनि अमृताला मोहिते हा जिवाला ।
विवश वश जहाला मोहिलेला तियेला ॥ १ ॥
समयिं बसुनि ऐशा, सुंदरा गोपबाला ।
कथिति हरिकथा त्या मोहिलेल्या विलोला ॥
हरि अखिल जगाला छेडुनी जो पळाला ।
मृदुलहृदय कैसा सोडि तो गोपबाला ? ॥ २ ॥
म्हणत कुणि कुमारी " दुष्ट गे हा मुरारी ।
करुनि हळुंच चोरी मारितो हा भरारी " ॥
म्हणति सकल नारी " गोष्ट ही सत्य सारी " ।
कथित मग बिचारी ठाउकी तीच चोरी ॥ ३ ॥
ललितचपलनेत्री कोणि ती चारुगात्री ।
म्हणत " शिकत कान्हा चोरि ही नित्य रात्रीं ॥
प्रथम करि लबाडी रात्रिला हा छबाडी ।
विलग विलग काढी कान्ति-चंद्रा निराळीं ॥ ४ ॥
वरित विमल आभा जाहला मध्यगाभा ।
त्यजित परि न दे जी पांडुला गोड शोभा ॥
गगन मग कुटी हा नीलिमा ही वरीली ।
त्यजित परि तयेची शून्यतेची तिजोरी ॥ ५ ॥

धवल शशि वरी हा नील आकाशिं राहे ।
हरि करि उलटें हें,--सांपडू चोरि नोहे ! ॥
पसरि धवल आभा, जाहला नील गाभा ।
नच मज कळतें गे, कोणती जास्त शोभा ! ॥ ६ ॥
निरखुनि हरितें मी पाहिलें ज्या दिनीं हें ।
फिरुनि न कधि माझें सापडें चित्त मातें ' ॥
नयननवगवाक्षातूनि चोरोनि आला ।
हृदय उचलुनीयां चोरटा हा पळाला ! " ॥ ७ ॥
म्हणत कुसुमकाया अन्य ते गोपजायां ।
" बहुत जगतिं म्यांही पाहिले चोर गे, या ॥
परि हरिसम नाहीं पाहिला चोर बाई ! ।
कशिच करित चोरी ! त्यास नाहीं तुकाई ! ॥ ८ ॥
सहज हसत बोले, काय डोळे करीतो ! ।
बघत बघत बाई काढुनी जीव नेतो ! ॥
अयि सखि ! मज सांगे काय चोरीच गे, ही ? ।
परत, हरि हरी तें, नावडे मागणेंही !! ॥ ९ ॥
उलट, गमत मातें, श्रीहरीनेंचि यावें ।
असत-नसत माझें सर्व चोरोनि न्यावें ॥
अधिक अधिक व्हावी गोड तों तों गमावी ।
अशि नच कधिं चोरी पाहिली अन्य बाई ! " ॥ १० ॥
म्हणत नयनलोला अन्य ते गोपबाला ।
नयनिं तयिं तियेच्या अश्रुचा बिंदु आला ॥
" अयि ! वदु तरि काई ? बाइ गे, झोप नेई ! ।
कळत नच सखे गे, चोरिली झोप केव्हां ? ॥ ११ ॥

असत जवळि तेव्हां झोप ही पाप वाटे ।
नसत जवळि तेव्हां लोचनीं नीर लोटे ॥
जवळि असुनि किंवा दूरही झोप नाही ! ।
हरिविण मज आता अन्य विश्रान्ति नाही !! ॥ १२ ॥
म्हणति जरि न निद्रा लागली, वेड लागे ।
खचित मज हरीचें वेड हें लागलें गे ॥
परि मजसि सखे गे, झोप यावी न वाटे ! ।
सकलसुखविनाशी वेड हें गोड वाटे " !! ॥ १३ ॥
करुनि बहु कथा ह्या सावळा चोर गातां ।
थकुनि पुलिनिं गेल्या झोपिं त्या गोपकान्ता ॥
कळत न परि किंवा त्या समाधींत गेल्या ।
परि नत जगजेठीनें हळू चुंबियेल्या ! ॥ १४ ॥

---

# *मुरली.

[ वृत्त.—मदिराकवित ]

कुंजन में जब पंछि[1] जगे[2], जब पंच[3] उषा नभ में उगि आयी ।
मारुत मंद सुगंध बहै[4], जब नारिन[5] लोचन नींद[6] गयी ॥

---

* हिंदीचेहि स्थानिक पोटभेद पुष्कळ आहेत; त्यांपैकीं व्रज व गुजराथ ह्या बाजूच्या एका विशिष्ट हिंदींत ही कविता केलेली आहे

१ पक्षी २ उच्चार--' जगे ' ३ पंच पच उष:काल. ४ उच्चार--' बहे ' . ५ स्त्रियांच्या. ६ झोंप.

तल्प नहीं अबु छोड उठी, खुल्हे लोचन सों पतिको मुख हेरी[2] ।
मुरलि सुने; बन में सुर छेडत बारिजभूषण[3] कुंजबिहारी ॥ १ ॥
स्वर्ग पर्‍यो[4] धरणीपर[5], सुस्वर नादनसों[6] नभ पूरि गयो[7] ।
" अयि नाथ उठो, अयि नाथ उठो, मुरलीरव कुंजन[8] मंजु भयो[9] " ।
तब नाथ उठे, दउरे[10] सब गोकुल, गायनकी बन[11] भ्रष्टि घनेरी[12] ।
गायन सों जगमादक छेडत बारिजभूषण कुंजबिहारी ॥ २ ॥
गोकुल सों सब उलट पर्‍यो, वन में हरि को सब तिष्ठत घेरी[13] ।
मत्त भये[14] सगरे[15] जन गायनस्वर्गसुधामधु पान करी[16] ।
भान हर्‍यो तब कौन कहांकर[17], ध्यान भयो सब एक हरी ।
बीच[18] खड्यो तब छेडत रागिणि[19] बारिजभूषण कुंजबिहारी ॥ ३ ॥
भूतल में सब दुःख भर्‍यो, नहि शांति कहूं[20] नयनों[21] कोहि[22] हेरी ।
त्रस्त भये सगरे जन शोक करे सुखशांतिन[23] चित्त धरी ॥

---

१ बिछाना २ पाहिलें ३ उच्चार–'बारिजभूखन,' मूळ शब्द–' बारिजभूषण '. ४ पडला, आला ५ उच्चार-' धरनीपर '. ६ नादांनी ७ भरून गेलें ८ कुंजातील, कुंजात ९ झाला. १० धावूं लागला. ११ वनांत. १२ दाट, अतिशय १३ घेरा घालून. १४ झाले. १५ सगळे १६ पान करून १७ कोठील १८ मध्यें. १९ उच्चार–' रागिनि '. २० कोठें २१ डोळ्यांनी. २२ कोणी. २३ सुख व शान्ति ह्यांना चित्तात स्मरून.

स्वर्ग तहांकर[1] भूतल पै[2] दिखलाइ गयो इहँ गान करी।
मुक्ति, समाधि, तबै सिखलावत[3] वारिजभूषण कुंजविहारी ॥ ४ ॥

---

## उषःकाल.

[ वृत्त.—वसंततिलका ]

गेली निशा परि दिशाहि न दीस झाल्या।
आता नसे तम, रवीहि परी नुदेला ॥
ऐशा नभस्थ हृदस्थहि संधिकाला।
देवा, स्मरूं तरि तुझेविण मी कुणाला ॥ १ ॥

---

## प्रभात.

[ वृत्त—द्रुतविलंबित ]

अयि, प्रभात नभात विकासली।
विमल कांतिहि शांतिस जोडिली ॥
तम जगा त्यजि झोपहि डोळिया।
रविहरी तम मर्दित कालिया ॥ १ ॥
रजनि ती नयना यमुना गमे।
उजळले नभजान्हविसंगमें[4] ॥
जगवुनी अजि ज्ञानरवीहि या-।
हृदयिं, नष्ट करो तमकालिया ॥ २ ॥

---

१ त्यांना. २ उच्चार-'भूतल पे'; भूतलावर. ३ शिकविता झाला.
४ आकाशगंगेच्या संगमाने.

# भाग दुसरा.

## वसंत.

[ वृत्त.—वसंततिलका ]

पाहोनि वाट थकलों ऋतुराज! तूझी।
अस्ता जगा सुखवि रे ऋतुराज! आजी॥
होवो बहार फिरुनी जग हें फुलोनी।
माझा वसन्त जगिं या सगळा भरोनी॥ १॥

सौंदर्य काननिं, जनात, मनांत, कोंदे।
आनंद काननिं, जनात, मनात, नांदे॥
ते गोडसे दिन पुन्हां मजला दिसों दे।
मेलों तरी सुदिन ते मजला स्मरों दे!॥ २॥

होवोत वल्लरि पुन्हां सुमभारदीना।
पुष्पें भरोनि नच भार सहो तयांना॥
नाना सुरम्य जगिं रंग पुन्हा फुलोत।
माझा वसन्त फिरुनी भरुनी जगात!॥ ३॥

वाहोत निर्झर सहास पुन्हा सुखानें।
गाणें खुलो अजि तदीय पुन्हां मजेनें॥
तद्गीतनाद फिरुनी अति मत्त होवो।
माझा वसन्त भरुनी जग गोड होवो!॥ ४॥

मोहावया जगत ते मधुगंध सारे।
येवोत या जगतिं रे, फिरुनी मुरारे!॥
चोरोत जीव मम, मोहुनि धुंद मातें।
माझा सखा फिरुनि येउनि तो जगातें॥ ५॥

रम्या वनस्थळि, सुनिर्मल नीर वाहे ।
छाया सुशीत, वन सर्वहि शांत आहे ॥
गानें मना रिझवि निर्झर मंजुशब्दें ।
ऐसें कुठे तरि मला फिरुनी बसो दे ! ॥ ६ ॥
बेभूल सृष्टिसि विहगामिषें वदों दे ।
लाका सुगंध बनुनी हरिला फिरूं दे ॥
उन्मत्त सृष्टिमद रूपमिषें फुटों दे ।
माझा वसन्तसुखिं जीव पुन्हां विरो दे ! ॥ ७ ॥

* * * * *

रे रे जगा ! उठुनि जागृत शीघ्र होई ।
होई सुसज्ज, ऋतुराज जगास येई ॥
होवोनिया अधिक सज्जन, शुद्ध होई ।
सौंदर्य, हर्ष, हरिही, भजण्यास येई ॥ ८ ॥

* * * * *

बागा समस्त फुलल्या — ऋतुराज आला ! ।
धाली वनें उपवनें — ऋतुराज आला ! ॥
धालीं सुखें जनमनें — ऋतुराज आला ! ।
गावोत कोकिल पुन्हां — “ ऋतुराज आला ! ” ॥ ९ ॥
गावांत कौमुदिमधें सुखि पौरनारी ।
न्हावोत त्या शशिकरीं रमण्या[1] विहारीं ॥
माजोत उत्सव समस्त जगांत आतां ।
माझा सखा फिरुनि या जगतास येतां ॥ १० ॥

---

1 पाठभेद — ‘ रमता ’

सौधावरी निजुनि ठेविति दीप थोडा ।
चंद्रास्त होय तइं घोर तमिस्र सारा ॥
छाया तदा पडति दीर्घ विनिद्रितांच्या ।
शोभा नभांत भरल्या वरि तारकांच्या ॥ ११ ॥
संस्पर्श ऊष्ण गमतो सखिला सख्याचा ।
संस्पर्श ऊष्ण गमतो सख्या सखीचा ॥
एकाहि दूर परि झोप न गोड वाटे ! ।
जावें दुरा जवळें यांतचि रात्र लोटे ! ॥ १२ ॥

*     *     *     *     *

साऱ्या जगासि फिरुनी तशि मौज यावी ।
सारी मनें हरिखुनी सुखिं दंग व्हावी ॥
थोडा तरी विसर या पडु दे जगाचा ।
येवोनिया फिरुनि तो ऋतुराज माझा ! ॥ १३ ॥

*     *     *     *     *

होता वसन्त सगळा जगिं एक काळीं ।
आतां सुखें विरळलीं, मळलीं, जळालीं ॥
स्वत्संगतीं गमत काळ फिरोनि ये तो ।
थोडा फिरोनि सुखलाभ क्षणैक होतो ॥ १४ ॥
पाहें तुझी म्हणुनि वाट वसन्तराया ! ।
काही पडो विसर, काहिं पुन्हा स्मराया ॥
येईल काय जगतास तसा वसन्त ? ।
येईल काय हृदयास पुन्हां वसन्त ? ॥ १५ ॥
नांदे न का जगतिं नित्य वसन्त देवा ? ।
नांदे न कां हृदयिं नित्य वसन्त देवा ? ॥

कां द्वेष हा, जगतिं मत्सर का असावा ?।
का स्वार्थ हा, उगिच का जगतांत हेवा ? ॥ १६ ॥
देवें सुरम्य जगतात वसन्त केला।
स्वार्थें नरें सकळ जाळुनि नष्ट केला! ॥
केलासि खून असला मनुजा! अघोर।
होणार काय रडुनी जरि दुःख फार ? ॥ १७ ॥

* * * * *

येतो वसन्त परि तो फिरुनी फिरुनी।
विश्रांति देइ जगता करिं लाडवोनी ॥
विश्रांतिनें फिरुनि हें जग हृष्ट होतें।
केल्या चुका तरि पुन्हां शिकतें जरा तें ॥ १८ ॥
ऐसें शिको जगत; काय वसन्त सांगे--।
ह्यातें कळो; जगतिं नित्य वसन्त रंगे--॥
ऐसी क्रिया जगत सर्व सदा करो हें।
जेणें जनीं मनिं सदाचि वसन्त राहे ॥ १९ ॥
ऐसा तुझा सदुपदेश जगा कराया।
ये ये फिरोनि जगतासि वसन्तराया! ॥
ये ये पुन्हा खचित रम्य जगा कराया।
त्वद्गीत ते हृदयगम्य फिरोनि गाया ॥ २० ॥
तो पूर्ण शाश्वत वसन्त जगासि येवो।
ह्यासाठिं हा फिरफिरोनि जगासि येवो ॥
त्वद्भक्त हा बघत वाट तुझी गड्या रे।
ये ये फिरोनि ऋतुराज! जगासि ये रे ॥ २१ ॥

* * * * *

हे सोडिले जरिहि सर्व उदात्त हेतू।
भाषे पुरोत मनि कोड म्हणोन ये तूं ॥

माझा फिरो फिरुनि जीव तुझे सुखांत ।
भेटोनि तूं प्रियसखा मजसी वसन्त ॥ २२ ॥
आहे तुझें भजसि वेड जणों जडालें ।
ध्यानें वसन्तमय काय विचार झाले ॥
थोडा वसन्त मम आचरणींहि येई ।
तेणें हर्ष नित जनीं मम येथ होई ॥ २३ ॥
नाहीं मनांत अथवा व्यवहारिं येथें ।
बा रे, तुझी दस ते, या हृदयीं असे ते--॥
माझ्या जशीहि जितुकी, म्हणुनी सदा मी--।
लोकांत मूर्ख ठरतों तवमार्गगामी ॥ २४ ॥
ये ये म्हणोनि तरि रे, मज शांतवाया ।
तूं मूर्ख, मी जगतिं मूर्ख,- सुखें मिळूं या ! ॥
आनंद माजवुं जगांत, सुखांत राहूं ।
ध्यावोनि त्या हरिसि, कांहिं सुरेल गावुं ॥ २५ ॥
ये ये म्हणोनि सखया मज शांतवाया ।
आहोंत मूर्ख, तरि संगतिं गोड गाया ॥
सौंदर्यभक्ति करण्या, हरिलागिं ध्याया ।
ये ये सख्या, खचित येइ वसन्तराया ! ॥ २६ ॥

---

# वर्षाकाल आला !

[ वृत्त —वसंततिलका ]

धारा स्वच्छ भरुनि भूमिसि न्हाणियेली ।
शाद्वल नवा हरित देउनि रंजवीली ॥

हृष नवी टवटवी खुलली धरेला ।
प्रावृट् विलासमय हा जगतास आला ॥ १ ॥
मेधाकृतीमुदित बाहित जो प्रियेला ।
हर्षे तिचें चुकुनि नांव वदोनि गेला ॥
तो लाजला गुरुजनीं युव पाहियेला ।
प्रावृट् विलासमय हा दावी जगाला ॥ २ ॥
झाकी लता तरुसि तो तरुही भिजाला ।
" म्या नाथ हाय नच शेवटिं रक्षियेला । "– ॥
वाटे, म्हणोनि झटते लपवावयाला ।
प्रावृट् असा प्रणय देत जगास आला ॥ ३ ॥
नाहीं शशी म्हणुनि खिन्न चकोर भारी ।
दीर्घा निशा, पति घरीं, सुखि ती चकोरी ॥
नाथा तिनें रमविण्या अति यत्न केला ।
प्रावृट् असा प्रणय हा शिकवी जगाला ॥ ४ ॥
चोरूनि अंगणिं उभा घनवृष्टि घेई ।
आली तदा अवचिता बघतोचि आई ॥
ओला उभा बघत कांपत बाळ तीला ।
प्रावृट् अशा खुलवितो किति बाललीला ! ॥ ५ ॥
पूरामुळें भरुनि तीर खचोनि गेला ।
नीरामधें तरुनि पार न कोणि झाला ॥
ऐशा नद्या फुलति पाहुनि ज्या सख्याला ।
प्रावृट् सरित्-रमण तो जगतास आला ॥ ६ ॥
जो हासतो विकट हास्य नभोगणांत ।
जो नाचतो थयथया धरणीतलांत ॥

जो क्रूर खात विरहीजनशान्ततेला ।
प्रावृट् असा हृदयभेदि जगासि आला ॥ ७ ॥
ग्रीष्मात सृष्टि त्यजि ऊष्ण असे उसासे ।
शीतामधें रडत ती दव तेंचि भासे ॥
हासे, फुले, बघुनि केवळ ज्या ऋतूला ।
प्रावृट् भला फिरत आज जगास आला ! ॥ ८ ॥

---

# मेघ.

[ वृत्त.— शार्दूलविक्रीडित. ]

हा ! हा ! राक्षस मेघ कीं कुणि नवा उन्मत्त झाला नभीं ।
राहूकेतु न हा तरी रविशशी ग्रासी, कुणातें न भी ॥
तारा खी तरि नाशि; मूर्ख बघ कीं हे काजवे माजवी ! ।
कार्याकार्यविचार नष्ट करुनी हा राक्षसा लाजवी ॥ १ ॥

*  *  *  *  *

आला अंबरिं मेघ कीं बहुरुपी तो कोणसा हो नवा ।
आहे कीं नच रंगरूप मुळिंही त्याला, महा बानवा ॥
घेतो रंग किती, क्षणांत नटवा रूपें किती दावितो ।
पाहोनी कृति हा मनापरि तसा भूतापरी भासतो ॥ २ ॥

*  *  *  *  *

सिंहाचेपरि गर्जतो, गजगती हा चालतां चालतो ।
रूपें पर्वत भासतो, उडत हा पक्षी महान् वाटतो ॥
विद्युत्खड्गहि राखितो, नटकला नानापरी दावितो ।
आहे संकर मेघ कोण न कळे, नानागुणें शोभतो ॥ ३ ॥

*  *  *  *  *

आकाशीं घनघोर युद्ध गमतें मेघामधें चाललें ।
वाटे वीजचि खड्ग, गर्जन गमें तोफामुळें जाहलें ॥
युद्धाचे श्रम जाहले म्हणुनियां हा घाम वृष्टी गळे ।
आतां हें गगनात युद्ध, हरि रे! त्वां पाहिजे तोडिलें ॥ ४ ॥

*　*　*　*　*

बाला गर्जुनि भेडवी, भिजवुनी नारी पथीं लाजवी ।
कोणी आसुनि यामुळें बघत त्या विद्युल्लता दाखवी ॥
तोंडें वेडवुनी जगासि चिडवी, खोड्या हजारों करी ।
आला मेघ नभांत वास्य गमतें हा बाल कोणी तरी ॥ ५ ॥

*　*　*　*　*

तारारत्ननिधी जया जठरिं, कीं येतो शशी ज्यातुनीं ।
वारी हें क्षितिजान्त नील, म्हणती ज्या मेघ वेडे जनीं ॥
लाटा खालुनि थोर आज दिसती मेघान्तरेषामिषें ।
कीं गंभीर पयोधि काय उलटा झाला नभीं हा दिसे ? ॥ ६ ॥

*　*　*　*　*

वाटे गोड वसंत नात म्हणुनी कामें घना धाडिलें ।
नाहीं इंद्रधनू, मनोजधनु हें यानें सवें आणिलें ॥
दुष्टें वृष्टि म्हणोनि पुष्पशर हे सर्वी जगा मारिले ।
हा! हा! देव मनोज! यासि करुनी त्वां दूत रे, साधिलें! ॥७॥

*　*　*　*　*

झाला मेघ म्हणोनि भास, परि हो कीं पापणी दृश्य ते ।
डोळे सूर्यशशांक, विश्व निजलां, हे वाटतें शांकितें ॥
नाहीं गर्जन हें खरें, मज गमे सानंद तें घोरतें ।
वाटे विश्वविलास आज हरिचा विश्राम हा घेतसे ॥ ८ ॥

*　*　*　*　*

किंवा तोषचि मूर्तिमान् घन असा लक्ष्मीधवें धाडिला ।
देई तो अधिकारचिन्ह अपुला त्या रंग देहीं निळा ॥
मेघें सृष्टि धुवोनि स्वच्छ, दिधलें खाण्यापिण्यातें तिला ।
आग्यें योरचि सृष्टिला खचित हो, हा पहुणा लाधला ॥ ९ ॥

*　　*　　*　　*　　*

कोणीही न उदारधी कधि कुठें मेघापरी पाहिला ।
दाता, धान्यधनासि सर्व जगता दे प्यावयातें जला ॥
वर्षा सौम्यपणा, समाद्धि जगता, सृष्टीस दे चारुता ।
देतो हर्ष मना, विलसहि जना, स्फूर्ति कवीतें सदा ॥ १० ॥

---

# मदनविद्धाचें ज्योतिष.

[ लग्न घाटत असता व वराला स्वतःला रूपवती वधू अतिशय आवडली असता उभयपक्षांच्या ज्ञात्या ज्योतिष्यांना उद्देशून वर स्वगत म्हणतो — ]

[ वृत्त —शिखरिणी ]

शुभांगी शोभे जी गगनसम नीलांबरवती ।
जरीचे बिंदू हे गगनिं शुभ्र तारे चमकती ॥
स्वयें चंद्राची कीं, वदनिं वसते ही सरसता ।
जशीचे, अज्ञानों ! ग्रह तरी तुम्ही काय बघतां ! ॥ १ ॥
जिचा उंचीचा कीं मदनराशि हा चित्त सदनीं ।
कृशांगीच्या जीच्या विलसति गुरुशुक्र नयनीं ॥
कपाटीं कुंकू तो विकसित वसे मंगल स्वतां ।
अहो जन्मांधांनो ! ग्रह तरि तिचे कोण बघतां ! ॥ २ ॥

सुकेशींच्या केशीं सुकिरण परावृत्त दिसतो ।
गणूं वेणीमाजी शनि रमणिच्या नित्य डुलतो ॥
सदा येथें राहू जवळि कवळू चित्त म्हणता ।
कसे रे मंदांनो ! ग्रह बघत हे स्वस्थ बसतां ! ॥ ३ ॥

उडे जाई मार्गे पदर पवनें कांपित दिसे ।
तदा केतू चेतोहर मदनसैन्यांत विलसे ॥
अशी तन्वी डोळे भरुनि बघुनी तृप्ति नसतां ।
रिकामे, अंधांनो ! ग्रह घुसळुनी काय करितां ? ॥ ४ ॥

* गुणांतें एकेका रदन करुनी ठेवि वदनीं ।
अशी रम्या माझी प्रियसखि गुणी कुंदरदनी ॥
शुभांगीसर्वांगा त्यजुनि निज पञ्चांग रडता ! ।
अता कैसे बानूं ! जरठ मजला सत्य दिसता ! ॥ ५ ॥

जिला लावण्याची सकल जन हे रास म्हणती ।
तनुस्थानीं जीच्या जननयनतारा विहरती ॥
धनस्थानी हीच्या तृषितहृदयें स्पष्ट असतां ।
अहो निर्बुद्धांनो ! ग्रह छळुनिया काय रडतां ! ॥ ६ ॥

स्वयें तारा किंवा ग्रहसकलधामैकरमणी ।
हिला सोडोनियां दिसत दुसरी काय तरुणी ॥
अशी ही टाकोनी " ग्रह ! ग्रह ! " लगें का बकतसां ! ।
मला रे, क्रूरांनो ! उगिच बसुनी कां छळितसां ! ॥ ७ ॥

---

* सुलक्षणी स्त्रियेचे गुण बत्तीस आहेत.

# तारुण्याची दारू

[ चाल.—फटक्याची. ]

तरुणपणाची, अति धुंदीची, दारु माजरी मी प्यालों ।
दारू पिउनी धुंद गडे हो, पुरा पुरा उल्लू झालों ! ॥ धृ० ॥
अति मौजेची, गोड भ्रमाची, अति धुंदीची दारू हो ।
धुंद पिवोनी धुंद झिंगलों जगताच्या बाजारीं हो ॥
झोक चालले जगिं पायांचे, झोक मनाचे जातात ।
वाट सोडुनी भटकत फिरतीं, कुठेंहि अडुनि पडतात ! ॥
सरळ वाट जणुं हरपुनि गेली, डोळे कांहिं न बघतात ।
तोंड चाललें बकत हवें तें, इष्काच्या गुलरंगात ॥
इष्काचा हा रंग रंगला, दारूला लाली चढली ।
दारु रंगली लाल गुलाली, इष्काची धुंदी भरली ! ॥
धुंदी भरली, लाल गुलाली, दुनिया झाली पागल हो ! ।
पागल जगतीं पागल फिरतों, पागल दारु प्यालेलों ! ॥
पागल दारू मीं प्यालों हो, पिउनी पागल मी झालों ।
तरुणपणाची दारू पिउनी उल्लु गडे हो, मी बनलों ॥ १ ॥
पाहुं नका कुणि मला गडे हो, मौज मला थोडी मिळुं द्या ! ।
मदनमस्त जगिं मौज करोनी जीव सुखानें रंगवुं द्या ! ॥
एक घडी तरि द्या मजला अशि, कोणिहि मजला बघूं नका ! ।
धर्महि नलगे, नीतिहि नलगे, कोणिहि जागे राहुं नका ! ॥
डोळे मिटुनी, सारे निजुनी, कोणीहि मजला पाहुं नका ! ।
पागल प्यारा जीव दुलारा, आज सुखानें मढवूं द्या ! ॥

---

* स्वकृत ' रंगपंचमी ' नामक नाटकांतील एका प्रसंगीचें गाणें.

मस्त जाहलों, पागल झालों, दारू प्यालों मी जगतीं ।
मनहि मातलें, हृदय मातलें, कांहिं दिसे ना मज पुढतीं ॥
सोडा मजला सगळे आतां, पागल प्यारा मी झालों ! ।
तरुणपणाची दारू पिउनी जगासि वायां मी गेलों ! ॥ २ ॥

## *जवानीचा पोवाडा.

[ चाल —शारदे, दास कामदे. ]

साजणी । सजलि पैंजणीं । चाले ठुमकुनी ।
घाव करणार । घाव करणार ।
ही गोड जवानी । छान-छबेली नार ! ॥ १ ॥
मोहिते । हृदय चोरिते । नाद लाविते ।
जीव हरणार । जीव हरणार ।
ही जान-जवानी । छान-छबेली नार ॥ २ ॥
चोरटी । रुचिर गोरटी । मोडे हलुवटी ।
हळूंच बघणार । वळुनि बघणार ।
ही छेल जवानी । छान-छबेली नार ॥ ३ ॥
फाकडी । पहे वाकडी । पायांमधें अढी ।
छेल गुलजार । छेल गुलजार ।
ही दारु जवानी । छेल छबेली नार ॥ ४ ॥
॥चाल॥ ही गोड जवानी, ऐका । परि एकदिनीं जाणार ।
वार्धक्य बसवुनी ताबा । यमराज पुढें नेणार ।

* स्वकृत ' रंगपंचमी ' नामक नाटकांतील, मागील कवितेच्याच प्रसंगींचें, दुसऱ्या एका पात्राचें गाणें.

हा स्वधर्म खालीं गेला । तो नष्ट पुढें होणार ! ।
अहो,-स्वदेश माती झाला । तोहि कां बुडूं देणार ? ॥ ५ ॥

॥चाल॥ तुम्हि जरी । धरुनि खंजिरी । आळविलि तरि
नाहिं वळणार । नाहिं वळणार ।
ही मानि जवानी । छान-छबेली नार ॥ ६ ॥
मानि ही । मागते मही । राज्यभोगही ।
मागे तलवार । मागे तलवार ।
ही मर्द जवानी । शूराची नार ! ॥ ७ ॥
साजणी । सजलिसे रणीं । चाले ठासुनी ।
घाव करणार । घाव करणार ! ।
ही घोर जवानी । शूराची नार ! ॥ ८ ॥
साजणी । सजले पैंजणीं । चाले ठुमकुनी ।
घाव करणार । घाव करणार ।
ही गोड जवानी । छान-छबेली नार ॥ – ॥

---

# *कवीतें.

**मयूख**—जयजयकार महाराज ! –

रजनिच्या संभ्रमें लोक सारा भ्रमे, भ्रमरही सर्व ते अन्ध झाले ।
रजनि नाहीं परी, रजनि नाहीं परी, धवलयश भूप हे देख आले ॥
यश-विभा फाकतां रजनि घे धवलता, रजनि जाणा अतां, लुप्त झाले ।
लोकहो, भ्रमरहो, दृष्ट व्हा, गा पुन्हां, नूतना ही उषा भव्य आली ।१।

---

* माझ्या "अस्तोदय" नाटकात वेगवेगळ्या प्रसगां भ टांच्या तोंडीं बरींच कवीतें घातलेलीं आहेत, त्यापैकीं ही चार येथें दिली आहेत.

**तिसरा भाट:**— जयजयकार महाराज !—

* कृष्ण गगनघन वारिष सों बरसे शर तेउं जिन्हों बरसाई।
खड्ग समंत फिरे तब विद्युततांडवभास जिन्हों दिखलाई ॥
समरकी पदधूलि जिन्हों अरिनारिविलोचनबारि धुलाई।
आवत सों नृपराज, उठो, अहिरावण नाम दिगंत सुनाई ॥ २ ॥

**मयूर** — जयजयकार महाराज !—

× भोर भयी अब कृष्णप्रतीपद चंद्र नहीं अब अस्त गयो।
भानुप्रताप रमे नभमों, क्षण एक गयो रवि पूर्ण भयो ॥
दोउं दिखे तब तेज तहां, निरखे पर को उभयों नभराजा।
पश्चिमपूर्व खडे तथ सन्मुख, अजि तेउं भयो दरबारन मौजा ! ॥ ३ ॥

---

* **अर्थ** —आकाशातील काळभोर मेघ ज्याप्रमाणें पावसाची वृष्टि करितो त्याप्रमाणें ज्यानें बाणांची वृष्टि केली, आपल्या अंगा-भोंवतीं जो खड्ग फिरवू लागला म्हणजे वीजेचें तांडवनृत्य सुरूं झाल्याचा भास उत्पन्न होतो, युद्धांत लढत असतांना पायावर बसलेला धूळ, पायाशीं बसून रडणाऱ्या शत्रु स्त्रियांच्या अश्रूंनीं ज्यानें धुवून काढविली आहे, तो अहिरावण हें नांव असलेला दिगन्त-कीर्तिमन्त सम्राट् येत आहे, उठून उभे रहा !

× **अर्थ** —कृष्ण प्रतिपदेची पहाट उजाडली आहे, चंद्र अद्यापि अस्ताला गेलेला नाहीं, सूर्याचें तेज आकाशात क्रीडा करीत आहे, व सूर्यबिंब पूर्ण दृश्यमान् होऊन एकादाच क्षण लोटला असेल-नसेल, अशा वेळीं आकाशात [ सूर्य व चंद्र हीं ] दोन तेजें दृश्यमान् होतात, व आकाशाचे हे दोन्हीहि राजे एकमेकांकडे टकटक पहात पूर्व-पश्चिम एकमेकांपुढें उभे रहातात; तशी आज ह्या दरबाराची मौज झाली आहे !

मगूस।—

पाळुनि त्वां मदमत्तपणें करि हे! सरिता कलुषा पदिं केली।
पकडिं त्या उठवोनि पदीं, तटधूलि तुवा जलिं पाडियली॥
थांब अतां पुलिनात, उभा क्षण राहि इथें, नदि हे करि! पाही—।
वाहत शांत, सुनिर्मल तेवि पुन्हां; गजराज वना मग जाई॥ ४॥

# *आत्महत्येपूर्वी.

[ चाल —फटक्याची. ]

फूलहि सुकलें, बागहि सुकली, पतंग आतां काशाला?।
प्रेमहि सुकलें, जगतहि सुकलें, जीवित आता काशाला!॥ १॥
फूलहि सुकलें, बागहि सुकली, पतंग उरला झुरण्याला।
प्रेमहि सुकलें, जगतहि सुकलें, जीवित उरलें मरण्याला!॥ २॥
फूलहि सुकलें, माळहि सुकली, सुगंध उरला प्रेताला।
प्रेमहि सुकलें, जगतहि सुकलें, जीवित उरलें देहाला!॥ ३॥
सरोज सुकलें, सरहि सुकलें, भ्रमर हाय हा काशाला?।
गाणें सरलें, कंठ कापिला! मैफल बसली काशाला?॥ ४॥

---

* माझ्या 'नवा बंगला' ह्या नाटकांतील प्रेमळ नायक वंचनेमुळें प्रेमभंग होऊन असह्य हृदयवेदना सहन न झाल्यामुळें आत्महत्या करण्यापूर्वी हें गाणें स्वतःच्या मनाशीं गात आहे.

# भाग तिसरा

## स्वराज्य-श्रीरंग.

( चाल:—भूपाळी.– घनश्याम सुंदरा )

लाल गुलाली उटी लाविली पूर्वेनें अंगा ।
उठा उठा हो, प्रभात झाली स्वराज्य-श्रीरंगा ! ॥ ध्रु० ॥
दिशा फाकल्या, निशा संपली, गगनागणीं लाली ।
असे पसरली, मांगल्याची वेळा ही आली ॥
आशि हीं समाजनें कळें ना कुणी नभीं केली ।
मज वनमाळी हाक मारितो वाटत या काळीं ॥
गमे हराचा हर्ष उसळतां गगना ये लाली ।
वाणि खुटली, हृदयें भरलीं, प्रेमें पाझरलीं ॥
काय कळे ना जगता हेंहें, हृदयें बावरलीं ।
कांहिं तरी ही मंगल वेळा जगा गमे आली ॥
मनें जागलीं, निजुनी उठलीं, हृदयेंही जागलीं ।
नीजहि नयनां सोडुनि गेली, प्राचीही उठली ॥
वनेंहि उठलीं, गावु लागलीं, सुमनेंही उमललीं ।
झोप टाकुनी उठा उठा हो, स्वराज्य-वनमाळी ! ॥ १ ॥
जगताचा व्यवहार थांबला तुझ्यावेणें देवा ! ।
उपासनाचा कुणी जगाला बोध, सांग, द्यावा ? ॥
तूं नसतां परि आर्यभूमिचें कोणी ऐके ना ।
तू न जागला म्हणोनि जगाला शान्ती लाभे ना ॥

स्वराज्य देवा, म्हणुनि तरी हो उठा उठा आतां ।
अन्न कशाला अधिक पहाता, उठा क्षणीं आतां ! ॥
झोप पुरे जाहली न देवा ! अजुनि काय तुजला ? ।
कधापासुनी निजुनि राहिला ! उठशिल कें आतां ? ॥
लक्ष्मि असली तू नच दिसता, सोडुनि ती गेली ।
कोणि न वाली दशा पोरकी अम्हां असे आली ॥
ऊठ दयाळा ! कलह मातला, समय कठिण आला ।
झोप टाकुनी उठा दयाळा स्वराज्य-गोपाळा ! ॥ २ ॥

---

# जागृतीचें स्वागत.

[ चाल.—पाळण्याची. ]

स्वागत स्वागत गे ।
ये ये गे । जागृतिदेवी ये गे ॥
स्वागत हें घे गे ।
राही गे । येउनि अमुच्या हृदयीं ।
देवी ये ये गे ! ॥ ध्रु० ॥
दुःखें अति झालीं ।
त्या कालीं— । झापी सारे मेलीं ॥
जागे कुणि नव्हतें ।
बघण्यातें । काय कुठें गे, होतें ॥
सारेही निजले ! ।
वैं नेलें । सर्वस्वाहि गे गेले ! ॥
आतां अम्हि रडतों ।
चरफडतों । दांत खाउनी करतों ॥

काय अतां होणें ।
जें हरणें । तें हरिलें गे त्यानें ॥
व्यर्थ अता रडणें ।
परि स्मरणें---। तुजसि, येवढें उरलें ॥ १ ॥
तुजला बहु स्मरिलें ।
जप केले । तुजला गे आळविलें ॥
नयने हीं थकलीं ।
जागोनी । वाट तुझी पाहोनी ॥
रात्र भयानक ती ।
त्या रातीं । घूक सर्व ओरडती ॥
चिन्हें अशुभाचीं ।
मरणाचीं । सारीं भवतीं साचीं ॥
गगनीं घन भरती ।
नभ वरतीं । खालीं सारी माती ! ॥
काळिज लटपटलें ।
भय भरलें । तेव्हां तुजला स्मरिलें ॥ २ ॥
देवी, तुज स्मरिलें ।
आळविलें । नाम तुझें बहु जपिलें ॥
कष्ट सोशियलें ।
चालविलें । अनुष्ठान जें धरिलें ॥
आहुतिही दिधल्या ।
त्या जळल्या । स्वर्गीं तुजसि मिळाल्या ॥
हृदय तुझें द्रवलें ।
कळवळलें । ओथबुनियां स्रवलें ॥
करुणा तुज आली ।
तूं आली । स्वर्गामधुनी खालीं---॥

माता तूं अमुची ! ।
दीनाची । स्वराज्यहीन जनाची ॥ ३ ॥
पाश अतां फिटले ।
पाहियलें । तुजसि एकदा नयनें ॥
दर्शन तव घडलें ।
तंव पहिलें । नवस सर्व गे फिटले ॥
प्रभात काली या ।
सुवेलि या । देवाच्या प्रहरीं या—॥
देव तो ! नमि या ।
देख या । येत देवि गेहा या ॥
पहु गे ही अमुची ।
नवप्राची । रहिवासी स्वर्गीची ॥ ४ ॥
दृष्टि हे आली ।
हृदयि कळ । चैतन्य स्फुरली ॥
सुप्रभ दरवळले ।
हळु सुटले । पवन ... वारे ॥
गाणे हे ... लें ।
मी म्हणि गेलें । र ... ध जे स्फुरलें ॥
तेज उचंबळलें
नभ ... । प्रभातकाळ गा रे !—॥
खुग, पिक, काव, सारे ! ।
गाणारे । जागृतिचे हलकारे ॥
मरा ललकारि ।
स्फुरणारी । रम्या चेतविणारी ॥ ५ ॥
देवी ही आली ! ।
ओवाळी । आरति आज सकाळीं ॥

काळ-आगिन ही ।
तूंज गायी । दीन जनांचे आई ! ॥
निद्रा सम गेली ।
शुभकाली । भरली प्रभात काळी—॥
मी ही भूपाळी ।
पदकमळीं तुझिया अर्पित केली ॥
र मन हे तुझें ।
वचनाचें । दि ास दैन्याचें ॥
अ सन्न हृदयाचे ।
वसण्यातें । देतो तुजला माते ! ॥ ६ ॥

---

# रायगडावर वीज चमकली !

[ चाल —फटक्याची ]

कोंही तरि हे सर्ध भासते विचार पडला चित्तासी ।
रायगडावरि वीज आज का घडे घडी चमके ऐसी ? ॥ ध्रु० ॥

घनाधकारें जगत व्यापिले, गगन घेरिलें मेघांना ।
रात्र जाहली, कोणि न वाली, दिनमणि गेला ा ानी ॥
अस व ा नीच प्र ा कुही माडिली म ा ार्ना ।
किर्रर अरण्यी खिन्न मनानें रा ा यी बसुनी-- ॥
करी विचारा तिपै, एकल, दीनपणें ...ी ।
रायगडावरि वीज चमकली पुन्हां ... ! ॥
रायगडा रे ! काय जाहलें ? मेघ कुठे ह चालले का ? ।
रायगडावरि घडीघडीने वीज आज ही चमके का ? ॥ १ ॥

रायगडावरि वीज चमकली इतिहासीं मी वाचियलें।
रायगडावरि वीज चमकली म्हणुनि दिवस हे तरि दिसले ! ॥
रायगडावरि वीज चमकली ह्मणुनी शेंडी जागि उरली।
रायगडावरि वीज चमकली ह्मणुनी कुंकुम शोभालीं ! ॥
रायगडावरि वीज चमकली — स्वराज्य डोळां पाहियलें ! ।
रायगडावरि वीज चमकली ह्मणुनि महाराष्ट्रहि उरलें ! ॥
रायगडावरि वीज चमकली मातृभूमि म्हणुनी जगली ! ।
हिंदभूमि जागि जगण्या कारण वीजाचे रायगडीं झाली ! ॥ २ ॥
तदा चमकली, लुप्त जाहली, अम्हां टाकिलें या तिमिरीं ! ।
काय आटवुनि पुन्हां अशी ही आज चमकते गडावरी ? ॥
बाई विद्युल्ले ! आज तूं कशासि श्रम हे करितेस ? ।
कोण तुझी ही तडफ, दीप्ति वा, पाहुनि त्यांचें करि चीज ? ॥
अकाल सारे श्रम हे तव गे ! आज कोण तुज बघणार ? ।
बघुनि तुझ्या त्या दिव्य दीप्तिला हृदयीं स्फूर्ती धरणार ! ॥
कोण पाहुनी तुज हर्षोनी दड ठोकुनी उठणार ? ।
सर्वस्वाची होळी करुनी आत्मयज्ञही करणार ? ॥ ३ ॥
जरी खरें हें तरी परंतू वीज अशी ही चमके कां ? ।
व्यर्थ आपुलें असे चमकणें हेंही इजला न कळे का ? ॥
रायगडाच्या वरि जी चमके वीज न वेडी ती इतुकी ।
काय भगाली स्वर्गामधुनी आज चमकते शिवबाची ? ॥
कष्ट सोशिले, प्राण वेचिले, स्वराज्य येथें स्थापियलें ।
कुळागार या पुढल्या पिढिहीं सर्वहि श्रम ते लोपविले ! ॥
ह्मणुनी रडतां गळुनी पडतां, तेजस्वी त्या पुरुषाचा ।
तेजस्वी हा अश्रुबिंदुही चमकत खालीं पडतो का ? ॥ ४ ॥
रायगड ! पाउलें जयाचीं पवित्र तूं हृदयी धरिलीं ! ।
अश्रुबिंदु स्वर्गामधुनी त्याचे पडती तव भालीं ! ॥

हाय हरी रे ! काय दशा ही ! काय अशी ही गति झाली ! ।
रायगडाला कोणि नाहि का – कोणि नाहि का आलि वाली ? ॥
रायगडा रे ! – रडूं नको रे, शिवराया रे ! – रडूं नको ! ।
आम्ही आहों तोंवरि तरि रे आह्मांदेखत रडूं नको ! ॥
जोंवरि आहे " महाराष्ट्र " हें नांव जगावर, – रडूं नको ।
महाराष्ट्र मेलें नच तोंवर स्वराज्य –आशा सोडूं नको ! ॥ ५ ॥
का दीपिका काहिं अम्हांशीं आज बोलणें आहे का ? ।
यागी तुमटे म्हणुनि अशी ही आज तुटकशी चमके का ? ॥
हा शिवरायें रायगडावरि निरोप आम्हां धाडियला ? ।
स्वराज्यबोधी शब्द ओजभी चमकत तुटका हा ये का ? ॥
धडपड सपता या वीजेची मनासि गमतें ही वाटे –।
मनातील काहीं तरी वदण्या, परी न साधे तिजला तें ॥
गे गे विद्युल्ले ! आज तू या तिमिरामधिं चमकोनी ।
कांहीं सार्थपणें दाविसि का रायगडातें उजळोनी ? ॥ ६ ॥
दर्शन पडलें आज तुझें हें, शकुन हाचि मीं मानियला ।
जाउनि सांगेन तुझें वृत्त हें ' महाराष्ट्र ' या देशाला ॥
स्वराज्य–आशा मला जन्मली तुझ्या दर्शनें हृदयाला ।
पुसेन जाउनि काय वाटसें शिववंश्याही मुलखाला ॥
हृदय बोललें हृदयापाशीं, भाषा नाहीं वदण्याला ।
कांहीं तरि मी जाऊन सांगेन भाव मनाचा जो झाला ॥
महाराष्ट्र देशा ! तुज आणुनि निरोप मीं हा पोंचविला ।
काम जाहलें, अतां थांबतों काय करिसि तें बघण्याला ॥ ७ ॥

# स्वातंत्र्याचें फूल.

[ चाल—फटका ]

ज्याचीं गाणीं गाणें, श्रवणें, हें फळ मंगलभाग्याचें ।
ऐका श्रोते, पुष्प वर्णितों, नवल फूल स्वातंत्र्याचें ! ॥ धृ० ॥
ज्या पुष्पाविण देश न शोभे, बाग न शोभे, जग विफळ ।
ज्या पुष्पाविण कोष न शोभे, देह न शोभे, तें फूल ! ॥ १ ॥
संकट काळा कडा भयंकर, भीषणरूपें तुटलासे ।
वरुनी बघतां डोळे फिरती, खालुनि बघतां यम भासे ! ॥
संग्रामाची वीज चमकते, शोकाचे नभिं घन भरले ।
गंभीर गर्जन दरींत घुमतां जगत गमे नाशा आलें ! ॥
अनर्थ झाला, वीज कडडली, वृष्टी झाली रक्ताची ।
वीज कोसळे रक्त वाहिलें,— वर्षे भरलीं सदींचीं ! ॥
उच्च भयाणीं तेथें कोणीं रोप पेरिलें खड्गाचें ।
फोफावुनि तें तिथें उगवलें, फूल उमललें नवलाचें ॥
फूल उगवलें नवलाचें तें, फूल उगवलें नवसाचें ।
नव नवसाचें फूल उगवलें — फूल अहो स्वातंत्र्याचें ! ॥ २ ॥
वनही नाहीं, उपवन नाहीं, एकहि नाहीं वृक्ष तिथें ।
लताहि नाहीं, कुंजहि नाहीं, उजाड सारें पडलेंसे ॥
काळा प्रस्तर दिसे सारखा, कडा भयंकर दिसताहे ।
जगत खावया वाट बघत हा उभा इथें जणुं यम आहे ! ॥
ह्या खडकावरि अश्रु सिंचुनी पाश तयाचे अधिं धुतले ।
स्तवन करोनी वंदन केलें, चित्तातें मग स्थिर केलें ॥

कालिजे चळचळ कांपत असतो त्यातें दाबुनिया धरिलें ।
गिळोनि अश्रू मग नैवेद्य सर्वस्वाच्या अर्पियलें ॥
पुढें बसोनी, ध्यान लावुनी, बीज पुढें जागृत केलें ।
महाकालिचें, रणदेवीचें उग्र रूप चित्तीं स्मरिलें ॥ ३ ॥
गुप्त मंत्र ते हृदयिं जपोनी बीज कालिचें जागविलें ।
रणदेवीचें, उग्र चंडिचें, महाबीज जागृत केलें ॥
तेज स्वर्गीं जें अघोर बसलें ध्यानें त्याप्रति डवचीलें ।
ध्यानें डवचुनि चंड कालिचें उग्र तेज जागृत झालें ! ॥
तेज दाटलें, तेज फाकलें; तेज उतरलें धरणीला ।
संग्रामाची वीज कडडली,—तेज उतरतें धरणीला ! ॥
तेज कोसळे; असह्य झालें; देव पातले बघण्याला ।
चंड कालिचा नाच चालला ' भीति वाटते काळाला ' ॥
काली नाचे, उग्र भवानी, चंड चंडिका रणमाता ।
मृडानि नाचे ' – डमरू शंकर वाजवितो मग नाशाचा ' ॥ ४ ॥
डमरू वाजे, शंकर नाचे, काळ पातला नाशाचा ! ।
मृडानिनाथहि नाचु लागला ! डमरू गर्जे अंताचा ! ॥
अंताचा तो डमरू गरजत, नौबत झडली काळाची ! ।
धु धु धु धु निनाद गाजे, भूक खवळली मृत्यूची ! ॥
खवळुनि वरुनी, स्वर्गामधुनी उडी टाकिनो धरेवरी ।
कठोर त्याचे पाय रुतोनी खपली गेली खडकाची ॥
खळगी झाली, रुधिरें भरिली, काली फिरुनी ती स्मरिली ।
गुप्त मंत्र ते हृदयिं जपोनी तिथें पेरणी मग केली ॥
बीज पेरिलें तिथें जपोनी स्वातंत्र्याच्या पुष्पाचें ।
स्वातंत्र्याच्या पुष्पासाठीं रोप रोविलें खड्गाचें ॥ ५ ॥
रोप रोविलें, कुंपण केलें. गुप्तपणाचें मग त्याला ।
जीव काढुनी, तेथें बसवुनि, त्यास पाहरेकरि केला ॥

" आत्माहुति "ही परवल ठरली, सर्व तयारी मग झाली ।
स्वातंत्र्याच्या नवल फुलास्तव फार वाट मग पाहियली ॥
युग युग वाटे क्षण क्षण जातां वाट अशी हो पाहियली ।
डोळे, तन-मन, एक फुलास्तव एकवटोनी बसलेली ॥
अलोट धैर्या साह्य घेउनी काळ कठिला कष्टानें ।
स्वप्राणाहि एकवटोनी दिवस काढिले धैर्यानें ॥
अहो देवहो ! या या बघण्या; खड्गलता ही फुलली हो ! ।
स्वातंत्र्याच्या पुष्पासाठीं खड्गलता चो रोविलि हो ! ॥ ६ ॥
महाकालिची लेक लाडकी रुधिरीं रुतुनी रुजली हो ।
रुजुनी फुलली, पानें फुटलीं चमकोचीं मग तिजला हो ॥
एकचि किंवा पान तिथें तें असे चमकते कीं बघता ।
भ्याड कांपतो, वीर हर्षतो, मोर गर्जतो भाटाचा ॥
भाटांची मग गरदी झाली, स्तवनें केलीं खड्गाचीं- ।
" खड्गलता रुजुनी वृद्धी हो महाकालिच्या वंशाची ! " ॥
स्वयंवराची वरदी उसळे, वेळ पातली वीराची ।
मराठ-अटक भाऊ म्हणिले, घटा पाहतो लग्नाची ॥
दृष्टी फुलली वीराची, मग हर्षे नारी परिणीली ।
मृत्यु करोनी स्वयें उपाध्या खड्गलता ती वरियेली ॥ ७ ॥
अखंड कीर्ती त्रिखंड झाली, दिग्गजही ते थरारले- ।
योग्य वराशीं महाकालिच्या लग्न लेकीनें आजि केलें ! ॥
खड्गलता मग जगि तळपे ती, दृष्टि न थांबे कोणाची ।
वीरहि चमके, खड्गहि चमके, क्रान्ति होतसे जगताची ॥
भ्याडहि रडले, राडा रडल्या --- रांडा पुरुषांच्या झाल्या ।
चळचळ खलही कांपु लागले, जगीं आरोळ्या काळाच्या ! ॥

काळ खवळला; मृत्यु खवळला, वीर खवळला कोपानें ।
पळतां लपतां भूमि सपली ! तांडव केलें कालीनें ! ॥
देव पातले, पूर्वज आले, गगनीं भरले बघण्याला ।
आनंदाश्रु आशीर्वच हे स्वातंत्र्याच्या पुष्पाला ! ॥ ८ ॥
आशीर्वचनीं त्या अश्रूंनीं भिजलें खड्गाचें मूळ ।
खड्गलतेच्या वरी उगवलें स्वातंत्र्याचें फूल ॥ ९ ॥
ह्याचीं गाणीं गाणें, श्रवणें, हें फल मंगलभाग्याचें ।
धन्य कवी तो पुष्प वर्णितो — नवल फूल स्वातंत्र्याचें ! ॥ ७ ॥

---

# गाणें अतां कशाचें !

## गझल

(चाल—सारे जहांसे अच्छा.)

आनंद सर्व गेला, स्वातंत्र्य सर्व गेलें ।
अंधार सर्व झाला, गाणें अतां कशाचें ! ॥ ध्रु० ॥
साम्राज्य नष्ट झालें, स्वातंत्र्यही निमालें ।
सर्वस्व नष्ट होता गाणें अतां कशाचें ! ॥ १ ॥
जगतांत मान नाहीं, रडण्यास वाणि नाहीं ।
रडतों म्हणों तरी रे, वाणी स्वतंत्र नाहीं ॥
बसण्यासि स्थान नाहीं, भूमी असे दुजाची ! ।
'माझी' चुकोनि म्हणता बर्दीत वाट त्याची ॥
कोठें अतां रहावें ? खावें, कसें जगावें ? ।
भृत्यूपरीस जगता गाणें कसें सुचावें ? ॥
नाहींच तोंड ज्याला जगतासि दावयाला ।
गाणें कुठोनि त्याला ?— गाणें अतां कशाचें ! ॥ २ ॥

दिन ते निघोनि गेले गाणें जईं सुरेलें ।
भूमींत ह्याच वसुनी त्या पूर्वजीं ह्मणीलें ॥
तो हर्ष सर्व गेला ' —तो हर्षराज गेला ! ।
त्याच्यासवेंचि त्याचा धनभार सर्व गेला ॥
आम्ही अतां भिकारी, खायासि अन्न नाहीं ।
गाणें अतां कशाचें ?— पोटांत अन्न नाहीं ॥
अन्नार्थ तडफडावें, अन्नार्थ रे रडावें ।
हें होचि आज अमुचें गाणें, दुजें कशाचें ? ॥ ३ ॥
साऱ्या जगासि ज्यांनीं वस्त्रें अमूल्य, नामी ।
दिधलीं करोनि पूर्वी, त्याचेचि वंशि आम्ही ! ॥
लज्जाहि रक्षण्याला नच वस्त्र नीट देहीं ! ।
ऐशा कुलांगनांनीं, अमुच्या स्त्रिया-स्वसांनीं ॥
ह्या आर्यभूमिमाजी, आम्ही जिवंत असतां ।
वस्त्रार्थ जीव द्यावे लाजोनि काय आतां ? ॥
वस्त्रार्थही मरावें माता—मुली—स्वसांनीं ।
ऐसी दशा असोनी, गाणें अतां कुठोनी ! ॥ ४ ॥
स्वर्गा मिळो ह्मणोनी परकीय येउनीया ।
चरणीं जिच्या ऋषींनी शिकलेत सर्व विद्या ॥
ती मायभूमि माझी परपाशबद्ध होता ।
' ही हीन, मूढ ' ह्मणुनी हिणवीति तेचि आतां ! ॥
साऱ्याहि संस्कृती त्या जेथोनिया निघाल्या ।
ती मातृभूमि माझी ठरलीच मूढ आतां ॥
मूढांचिया कुदेशीं मी एक मूढ गाता ।
मज मानहीन भाटा गाणें कुठोनि आतां ! ॥ ५ ॥

होता अशोक राजा तइ मान पूर्वि होता ।
तो चंद्रगुप्त होता तइं मान पूर्वि होता ॥
होता प्रतापराणा — जगतात नाम होता ।
आदित्य विक्रमाचा तपसांचि मान होता ॥
जेव्हां जिजाकुशीला वशीं शिसोदियाच्या ।
स्वातंत्र्यसूर्य आला, तइ मान पूर्वि होता ॥
कोठूनि मान आतां ! आम्ही असे निकामी ।
जर्गि मान कांहि नाहीं; गाणें अता कशाचें ? ॥ ६ ॥
अरध्या जगासि आर्यी शिकवोनि धर्म दिधला ।
ह्या देवभूमिच्या ते पडती अजूनि पायां ॥
गे मातृभूमि माझ्या ! रविच्या अतुल्य वंशी ।
जन्मोनि राघवानें तुझियाचि गे, कुशीसी ॥
जें राज्य येथ केलें तुझियाचि गे, प्रदेशीं ।
तें काय सांग माते ! ह्या मानहानिसाठीं ? ॥
रे रे रघूत्तमा ! ती प्रासादहर्म्ययुक्ता ।
रम्या तुझी अयोध्या झाली उजाड आतां ! ॥ ७ ॥
गे मातृभूमि ! तूझ्या कुंजात एक काळीं ।
वनमाळि तो बसोनी मुरलीरवें सकाळीं — ॥
परसोनि मोहिनीला मोही चराचराला ।
हा ' हाय ' आज नाहीं तो गोड वेणुवाला ! ॥
बागा, वनें, गिरींचीं शिखरें नवांशुकाळीं ।
तूझीच वेणुनें त्या प्रतिनादयुक्त झालीं ॥
मुरलीहि ती निमाली — मुरलीहि ती निमाली ! ॥
प्रभु नंदलालजीची मुरलीहि ती निमाली ! ॥ ८ ॥

वाटे भयाण डोळां मथुरा अतां पहातां ।
यदुराज आज नाहीं वृंदावनांत आला ! ॥
कोठूनि आज गीता ? कोठूनि माल आतां ? ।
कसलें सुगीत गाता ? गेलेंचि सर्व आतां ! ॥
गाणें न भोवताली जगतात दृष्टि येता ।
गाणें न मातृभूमीकंठामधूनि निघतां ॥
गाणें न अंतरंगीं हर्षें फुटूनि येतां ।
येथें अशा अकाळीं गाणें कुठोनि आतां ! ॥ ९ ॥
माते ! उषा गमे गे, गेली कुठें उडोनी ।
माध्यान्हही थकोनी निजला कुठें लपोनी ॥
सायान्ह मात्र राही, अस्तासि सर्व जाई ।
भूकांविणें कुणाचा रव येथ अन्य नाहीं ॥
ज्यांना उषाचि नाहीं, ज्यातें प्रभात नाहीं ।
रविचा प्रकाश नाहीं, माध्यान्ह शांत नाहीं ॥
सायान्हि अभ्रमस्ता आम्हां अभागियांचें ।
अस्तासि सर्व जातां मी काय गाउ गीतें ? ॥ १० ॥
झाली उजाड मथुरा, झाली उदास यमुना ।
झाली तशी अयोध्या, शरयू न गात गाना ॥
उध्वस्त उज्जनी ती, नालंद लोपलें तें ।
गेलीहि तक्षशीला, तें इंद्रप्रस्थ गेलें ॥
विजयानगर गेलें, गडराज रायगडही ।
हा ! हा ! पुणें बुडालें ! उरलें न तेंहि पाही ! ॥
काहींच जेथ नाहीं येथें अशा भयाणीं ।
बैसोनि ह्या स्मशानीं मी काय गाउ गाणीं ? ॥ ११ ॥

यमुना, शतद्रु, गंगा, सिंधु, अशा नद्यांनीं ।
मद शोणभद्र किंवा तो ब्रह्मपुत्र ज्यांनीं ॥
किंवा नगाधिराजें पूर्वी हिमालयानें ।
ज्या आर्यपूर्वजांतें येथेंचि, डोळियानें,– ॥
सौख्यांत लोळतांना, आनंद उपभोगितांना ।
सौख्यराशि वैभवाच्या जावोनि नाचतांना– ॥
आहे विलोकिलेलें, तेथें अतां स्मशानीं ।
शून्यशा बसोनी मी काय गाउं गाणीं ? ॥ १२ ॥

नगराजही रडावा, गंगाहि शुष्क व्हावी ।
दुःखें अशीं असह्यें अम्ही सोशिलींत आई ! ॥
सोसूनिही पुन्हा तीं वरि होय मानहानी ।
आता कसे जगावें येथेंहि सांग आम्हीं ? ॥
दुःखेंहि सोसण्याला जागीं अंत आहे ! आहे ।
नित दुःख मात्र सहणें – जीवीत काय गे, हें ? ॥
दुःखाविणें अम्हाला दुसरें जिणें न ठावें ! ।
येथें अतां बसोनी मी सांग काय गावें ? ॥ १३ ॥

रे नगाधिराजा ! आधार जो द्युलोका ।
गे शीतधारि गंगे ! आता तुम्ही विलोका ॥
उध्वस्त, त्रस्त, दुःखी ही दीन माय माझी ।
तुमच्या पदीं पडे जी थकुनीच काय आजी ॥
तुम्हीच पाहिलेंसे पूर्वी हिला सुखीही ।
आशीर्वचा अम्हा द्या कीं हो पुन्हा तशी ही ॥
काळीज कापते हो रडतां हिला पहातां ।
ही मातृभूमि रडतां गाणें मला कशाचें ? ॥ १४ ॥

काळीज करपते गे रडतां तुला पहातां ।
रडण्याविणें परी तू करिशील काय आतां ? ॥
कोणीहिं नाहिं त्राता, कोणी जगीं न वाली ।
ऐसी दशा जहाली, रडुनी थकोनि गेली ॥
ऐशाहि हीन काळीं गगनांत अंशुमाली ।
उगवोनि काय कोणी दु:खें हरील सारीं ? ॥
कोठें असे रवी तो ? केव्हा दिसेल डोळां ? ।
ये ये रवे ! दयाळा! कठांत प्राण आला ! ॥ १५ ॥

वनवासि जानकीनें उठुनी प्रभातकाळीं ।
तोडोनि साठवीलां पद्रांतुनी गळाली— ॥
कुसमें जया स्थळीं गे, तेथेंचि — त्याचि स्थानीं ।
अश्रू तुझे गळोनी पडतां अतां बघोनी— ॥
हृदयांत काय होतें, जगतांत सांगण्यातें— ।
नाहींत शब्द माते ! वाणी थकोनि जाते ! ॥
दु:खांत ह्या झिजोनी कासा हिनें मरावें ।
ऐसेंचि देवराया ! तुजलागि काय वाटे ? ॥ १६ ॥

आला गळा भरोनी हें दु:खगीत गातां ।
तूं अश्रुयुक्त असतां गाणें मला कशाचें ? ॥
डोळ्यांत अश्रु तुझ्या, कंठांत गान माझ्या ।
हा ! हा ! नकोचि माते ! मज कंठ देहिं ऐसा ॥
तूं अश्रुनें भिजावें, मीं पाहुनी रडावें ।
आवेग एकमेकां बघतां अशोक यावे ॥
जीवीत हेंचि तुझें जीवीत हेंचि माझें ।
अश्रूंसि वाट देणें हें गान आज माझें ! ॥ १७ ॥

गे मातृभूमि ! स्वप्नें अश्रूमध्यें विराली ।
तारा समस्त तुटल्या; वीणाहि भग्न झाली ॥
सारीं सुखें जळालीं, आशा जळोनि मेली ।
कंठस्थ गानशक्ती तीही सये ! निमाली ॥
गाऊं अतां कुठें मी ? गाऊं अतां कुणा मी ? ।
गाऊंचि काय गे, मी ? मज सांग मातृभूमी ! ॥
पिय अश्रुचें भरोनी गाणें सुरेल पेला ।
माते ! तुला अता मी ह्या देत प्यावयाला ॥ १८ ॥
नैवेद्य हाचि तूं तें माझा अभागियाचा ।
कांहींच अन्य नाहीं, तुज देऊं काय आतां ॥
माते ! समस्त कमलें दिसती सुकोनि गेलीं ।
ह्या स्वर्गतुल्य भूची सारी छवी निमाली ॥
सारीं फुलें सकाळीं गमनांत अश्रुजालीं ।
मिळलीं तुझ्याच माते ! देऊं कशीं तुला तीं ? ॥
देऊं तरी तुला मी गे, सांग काय आता ? ।
हे प्राण एक माझे, तुज तेचि अर्पि आतां ॥ १९ ॥
जन्मोनि आजिच्या ह्या उध्वस्त, दग्ध कालीं ।
मी असावेंचि माते ! तव पाहिलीं गकालीं ! ॥
आता भविष्यकाळीं कोणी सुभाग्यशाली ।
येईल गे, कवी तो गाईल निरनिराळीं— ॥
गाणीं तुझ्या यशाचीं, गाणींहि वैभवाचीं ।
गाणीं तुझ्या हवेल्या, प्रासाद, बाग, ह्यांचीं ॥
त्याचें नशीब मोठें ! गावो सुखें बिचारा ! ।
मी तों असा अभागी — रडलोंचि जन्म सारा ! ॥ २० ॥

रडुनींच जन्म गेला बसुनी तुझ्याच पायीं ।
दोघांचियाहि डोळां अश्रूसि खड नाहीं ॥
आम्ही तुझे कधीं गे, स्मित पाहिलेंच नाही
पायींच जन्म गेला — स्मित पाहिलेंचि नाहीं ! ॥
आम्ही असे अभागी — स्मित पाहिलेंचि नाहीं ! ।
माता अशी असोनी — स्मित पाहिलेंचि नाहीं ! ॥
का गे, असे अभागी जन्मासि आम्हि आलों ।
माता तुझेपरी गे,—स्मित पाहिलेंचि नाहीं ! ॥ २१ ॥

माते ! अशा स्थळीं कीं फिरुनी अशाचि काळीं ।
मज जन्म देइ कीं गे, सारी छबी निराळी ॥
बागा, फुलें, झुळांवीं, धनधान्यही असावें ।
जनि प्रेमही असावें, आरोग्यही वसावें ॥
कांहीं उणें म्हणोनी तुझिया सुखा नसावें ।
स्वायत्तता असावी, स्मित तें तुझें दिसावें ! ॥
दे जन्म तैंच, गाया गाणें तुझ्या यशाचें ! ।
गाईन तें सुखानें गाणें अतां कशाचें ! ॥ २२ ॥
दे एक गाउ दे गे, गाणें तुझ्या यशाचें ! ।
गाईन मी सदा गे ! गाणें अतां कशाचें ! ॥ २३ ॥

# बाळाजी विश्वनाथाचा एका आधुनिक तरुणाशीं संवाद.

[ पुण्याच्या 'अनाथविद्यार्थीगृह—मेळ्या'साठीं इ. स. १९२४ सालीं लिहिलेला एक संवाद ]

[ **चाल** —तेथेंच उभी कां आले । जागी कीं शयनीं निजले । ना कळे ॥ ]

**तरुण**—[ स्वगत ] जाहली वेळ ऑफिसची ।
उघडुनी काम करण्याची । ही अतां ।
मी असा आत जाणार ।
अर्ज हा तिथें देणार । मी स्वता ।
साहेब खूप होणार ।
नोकरी मजसि देणार । तो अतां ।
"थँक्यु" मी त्यास म्हणणार ।
हसुनिया तोहि बघणार । मज अतां ।
मी फॅशनींत रहाणार ।
विसरुनी जगत जाणार । मी अता ।
भाषणीं । वचनि, लोचनीं । ऐट आणुनी ।
पूर्ण साहेबि । पूर्ण साहेबी ।
साहेब पूर्ण बनणार । मी अता ॥ १ ॥
परि हाय ! काय हें दिसलें ? ।
आडवें कोण मज येतें । हें इथें ।
वाटेंत कोण हा आहे ।
दांडगा मनुज हा जुना्ची । ना कळे ।

"मॅनर्स" न कळती याला ।
जन्मला कशाला असला । ना कळे ।
वाटते भीति परि बघुनी ।
पाहुनी तेज हें वदनीं । याचिया ।
हा काय कुणी उमराव ? ।
राजा, कीं किन्नर, देव ? । ना कळे ।

**बाळाजी वि०** —नाहिं रे । नाहिं हें खरें । भूत सत्वर ।
वासना उरतां । वासना उरता ।
पेशवे भूत अम्हि होतां । या जगीं ॥ २ ॥
बाळाजि विश्वनाथाचें ।
ऐकिलें नांव गरिबाचें । का कधीं ? ।
मी तोच पेशवा पहिला ।
भूत जो अभागी झाला । तोच हा ।
राजा न देव, नच थोर ।
भोंसलेपदीं ' चाकूर ' । तोच हा ।
पातलों फिरुनि घरणीला ।
हें पुणें पुन्हा बघण्याला । बालका ।

**तरुण**— काय हो इथें बघणार ! ।
बघुनिया तुह्मी रडणार— । पेशवे ।
पाहुनी । अश्रु लोचनीं । तुह्मां येउनी ।
हृदय उळणार । हृदय फुटणार ।
हें पुणें बघुनि रडणार— । पेशवे ॥ ३ ॥
आलात कशाला येथें ? ।
दुहिचेंच राज्य दुमदुमतें । ज्या इथें ।

व्यक्तींच्या द्वेषासाठीं ।
देशातें हे मुठमाती । वोपिती ।
भांडणा-भांडणाखालीं ।
बंधूंच्या खोलुनि खालीं । रडविलें ! ॥
हें पुणें नसे तें पहिलें ।
जें दिगन्तही गाजविलें । तुम्हि जनीं ।
भांडुनी सर्वही गेलें ।
परि भांडण नाहीं सरलें । पेशवे ! ।
हें पुणें । तेच हें जुनें । आज भांडणें ।
हाय हो फुटलें । हाय हो फुटलें ।
पेशवे ! पुणें हें सारें । भंगलें !! ॥ ४ ॥

बाळाजी वि०:— हा ! रडें कोसळें मजला ! ।
खचितचि का इतुका फिरला । काळ हा ? ।
विश्वास असे परि माझा ।
कारण, तूं असशि मराठा ! । बालका ।
हें वृत्त दुःख दे मजसी ।
परि आधिकाचि कुढुनि रडसी । कां वरे ? ।

तरुण:— तो तिलकदेव आठवला ! ।
हृदयींच्या अमुच्या झुला ! ।— लोपला ! ।
तो लाल हिंदभूमीचा ।
तो प्राण महाराष्ट्राचा ।— लोपला ! ! ।
हें पुणें । वाटत सुनें । त्याचिया विणें ।
दीप हो विझला । दीप हो विझला ! ।
तो खरा पुढारी अमुचा ।— लोपला ! ॥ ५ ॥

**बाळाजी वि०.**— रडुनिया काय बा होतें ! ।
रडणें न मराठ्याला तें । शोभतें ।
अजुनिया धरुनिया धीर ।
बनुनिया वीर खंबीर । तुम्हि व्हा ।
तूं काय पुढे करणार ? ।
देशार्थ काय करणार ? । प्रश्न हा ।
तू जासि कुठें बा आतां ? ।
जाणण्या कुतूहल चित्ता । वाटतें ।

**तरुण**— मी काय आपणा सांगू ? ।
भाकरी साहेबा मागूं । चाललों ।

**बाळाजी वि०.**- चाकरी । कोर भाकरी । लाभही वरी ।
तीहि परक्याचि । तीहि परक्याची ।
खावया लाज नच साची । काय रे ? ॥ ६ ॥
मी तुझे वयाचा असतां ।
घेउनी स्वराज्य सनदा । येत मी ! ।
नाहिं मी बढाईसाठीं ।
कथियली गोष्ट परि तुज ती । बालका ।
परि खेद तीव्र मज झाला ।
वचन ये सहज तोंडाला । म्हणुनिया ।
पाणि का मराठ्याचें तें ।
इतुक्यांत लोपलें इतुकें । तिखट तें ।
तुज अशा मराठा तरुणें ।
देशाचीं करुनी अंगणें । खेळणें ।
खेळलों । अम्ही जिंकलों । फिरुनिहि मुकलों ।

स्वराज्यालागि । स्वराज्यालागी ।
ह्मणुनिया भूत या लोकीं । जाहलों ॥ ७ ॥
राहिली स्वराज्यीं आस ।
दुसरी न काहिंही प्यास । ह्या जिवा ।
स्वर्गात जाउनी पडतों ।
तरि तिथेंहि आह्मि तडफडतों । त्याविणें ।
या अह्मां वाडवडिलांतें ।
येवढी भीक कां बा रे । तुह्मि ह्मरा ।
फिरुनिया स्वराज्यासाठीं ।
करुनिया जिवाची माती । तुह्मि ह्मरा ।

तरुण.— बच दोन बोलुनि ताता ! ।
लाजवा अधिक नच आता । पद धरी ।
वाहिली । शपथ आपली । काय मी करी ।
स्वराज्यासाठिं । स्वराज्यासाठीं ।
साक्ष ह्या असे जगजेठी । तो विभु ॥ ८ ॥

# भाग चवथा.

## दुःखराक्षस.

[ वृत्त—विबुधप्रिया. ]

दुःखराक्षस माजला जगिं, यश सर्वहि मोडितो ।
घेतसे बळिही किती, परि खावया नच त्रासतो ॥
खात हा नरमास नित्यचि, तोंडी देह जिवतही ।
'हाय ! हाय !' सदा मुखीं, अति त्रासली सगळी मही ॥ १ ॥
ओढितें मन, सोडुनी जन, सेवु कानन जाउनी ।
कंद, कंदर, वारि सुंदर, सृष्टि सोज्ज्वळ सेवुनी— ॥
घालवूं दिन; वाटतें फिरुनी मना 'करितां असे ।
मी पडेन सुखीं परी जगिं दुःख कोण वधील हें ?' ॥ २ ॥

---

## आयुष्याची जखम.

[ चाल—फटका ]

नित्य दुःखें ही, बरी न होई काय करावं कळेंचि ना ! ।
आयुष्याची जखम जिवाला कुणी मारिली उमजे ना ॥ ध्रु० ॥
रुक्ष जगीं या स्नेह न कोठें, स्नेहें मृदु ती तरि होते ।
स्नेहाविण ती तडतडतांना नित्य वेदना जगिं होते ॥
नित्य आतुनी ठणकत राहे, जिवासि सहती न वेदना ।
आयुष्याची जखम अशी ही कुणी मारिली समजे ना ! ॥ १ ॥
मृत्यु औषधी काय तियेचें ? -कडू जहर हो औषधि हे ! ।
गमे कीड तीं या दुःखांतिल ! यावरि औषधि ती नोहे ! ॥

" मृग " जीवांचें काय जाहलें ? जखम ही बरी झाली का ? ।
आयुष्याची जखम खोल ही इतुकी दुखरी झाली कां ? ॥ २ ॥
आयुष्याची जखम ही अशी केली कोणी किंवा कां ? ।
जरीहि केली, बरी न होतां, इतुकी दुखरी झाली कां ? ॥ ३ ॥

# शोक

[ चाल —अवधूत निराकारी ' ]

बंदे ! तू क्यौं रोता है ? ।
एक दिन सबही जाता है ! ॥ ध्रु० ॥
राम, यदुपती, वीर भारती ।
सबही एक दिन मट्टि भये ।
ऋषी, मुनी, सब बडे तपस्वी ।
वहभी सारे मट्टि भये ! ।
वेद लिखे जिन्ह, शास्त्र लिखे जिन्ह ।
वहभी सारे मट्टि भये ! ।
तूहि कालका कौन सगा है,
तरा कोहि न जावे ? ॥ १ ॥
इस दुनियाका यही नियम है ।
सबही मट्टी होता है ।
मट्टीकी यह दुनिया घटि है ।
मट्टी सबको बनाती है ।
मट्टि बनाके उस खा जाती ।
ऐसी दुनिया चलती है ! ।
बंदे ! रोता तू न अकेला,
दुनिया सबको रुलाती है ! ॥ २ ॥

# सर्पदंश.

( चाल— अजि अंकुर हा० )

नाहीं मी ज्याचा अपराध,कधींहि केला ।
तो जगत्सर्प मज डसला ! ॥ ध्रु० ॥
मज गगनाचें वारुळ थोर गमे हें ।
हा जगत्सर्प बसलाहे ॥
आम्हि अज्ञानें इथें बालकें जमलों ।
क्रीडत वारुळीं रमलों ॥
जगिं बालें हीं प्रथम सर्व हसतात ।
क्रीडेंत दंग असतात ॥
परि कळुनी वा नच कळतां उत्पात —।
कीं जगत्सर्प हा डसला ! ॥
जरि बालें हीं प्रथम सर्व हसतात ।
शेवटीं सर्व रडतात ! ॥
हा सर्प जया नाहिं मुळींही डसला ।
विरळाच कुणी तो सुटला ॥
( चाल ) मम खेळ संपला नाहीं ।
वय फार लोटलें नाहीं ।
हास्यही थाबलें नाहीं ।
मज सर्प हाय तो डसला ।
जगताचा रंगचि गेला ! ॥ १ ॥
भ्रम खेळाचा शीघ्र सर्व मावळला ।
हसण्याचा स्वर कोंदटला ॥

सुर गाण्याचा पूर्ण विसरुनी गेला ।
हातांसि ताल मग कुठला ? ॥
अजि चिंतेचें, दग्ध अशा आशांचें ।
विष रुधिरिं मिसळलें साचें ॥
हें विष आता हृदयिं फिरुनि छळणार ।
मजदेह अंत करणार ॥
प्रभु तुज ठावें काय अधिक करणार ।
होणार तेंचि होणार ! ॥

(चाल) मम खेळ परी सरला हो !
मज जगत्सर्प डसला हो !
आनंद अतां पुरला हो !

अजि जन्माचा विरस सर्व हो झाला ।
मज जगत्सर्प हा डसला ! ॥ २ ॥

मी उन्नतिचा यत्न जगीं या केला ।
परहितीं यत्न राखियला ॥
मी प्रेमानें नित्य जगा कुरवाळी ।
जें घडी देव वनमाळी ! ॥
जें लावण्यें गोड त्याचिया भरलें ।
आजि निर्दय केंवि जहालें ? ॥
रे जगता रे ! छान तुवां फसवीलें ! ।
निज रूप खरें लपवीलें ॥
जें आजवरी प्रेमभरें कवळीलें ।
तें आज कसें हें दिसलें ! ॥

अजि प्रेमाचें नांव अतां ना उरलें ।
मज स्मशान जग हें झालें ॥
(चाल) काळीज चरकुनी फुटले ।
डोळेचि मनाचे थिजले ।
जगतही वाटतें मेलें ।
मज भय वाटे बघुनि शून्य जगताला ।
मज जगत्सर्प हा डसला ! ॥ ३ ॥
आजि जगताचा संग सर्वही तुटला— ।
मम प्रेम जाय विलयाला ! ॥
तुज सोडिन मा, न्यासु नको र मजला ।
कां जगा ! उतावीळ झाला ? ॥
मम हृदयाचा बांध हाय हो फुटला ! ।
पुसत कोण हो हृदयाला ! ॥
(चाल) हृदयें हीं नित्य फुटावीं ।
काळिजेंहि नित्य जळावीं ।
आसवेंहि नित्य गळावीं ।
ह्यासाठीं हा थाट जगाचा सजला ! ।
मज जगत्सर्पे हा डसला ! ॥ ४ ॥

## जगत्

[ वृत्त —शार्दूलविक्रीडित. ]

जन्मापासुनि मी सदा बघतसें, मी आजही पाहतों ।
भासें नित्य तसेंचि, नित्य परि हें मी पाळडें जाणतों ॥
ऐशी ही स्थिति; मी तरी समजतों मातें जगत् हें कळे ।
" मातें काय कळे ? " स्वतासि पुसतां सांगो न कांहीं मिळे ॥ १ ॥

जेव्हां 'हें कळलें मला ' समजुनी विश्वासि मी पाहतों ।
तेव्हां तत्क्षणि ' हें कळे नच मला ' हें कां न मी जाणतों ? ॥
कांहींहि न कळे तदा कळतसें ऐसें मला कां गमे ?।
आहे कोण असें मला चकवितें जें चित्रशा ह्या भ्रमें ? ॥ २ ॥
जादू हे जगतासि अगगत, कीं माया जगत्कारणें–।
केली जी म्हणता स्वतासि चकवायात जगाच्या भ्रमें ? ॥
कांहीं सत्य असा, गमें ' मज कळे ' तेव्हांहि हें ना कळे ।
मातें ' हें न कळे ' तदा नच कळे, मातें कळे, ना कळे ! ॥ ३ ॥
नाहीं दोनचि कीं, ' कळे, ' ' नच कळे ' आणीकही त्या किती–।
वृत्ती भिन्न परिस्थितींत मजला वेडावुनी सोडिती ॥
आहे हेंचि जगत् मला नित नवें नानापरी भासतें ।
एका वृत्तिस माझिया जणु नव्या एका स्वरूपासि घे ॥ ४ ॥

वस्तू, मानव, कल्पना, जणु दुकानाचेच सारे धनी[1] ।
सारे एकचि गोड माल विकण्या हाटामधें थाटुनी–॥
बैसोनी, ' सुख हें मदीयचि असे सर्वांहुनी श्रेष्ठ हो ' ।
ऐसें ओरडती, जिथें मृदु मना नादें अशा त्रास हो ॥ ५ ॥
जेथें कोणि कुणासही नच पुसे, गोंगाट कादाटला ।
सारा गोंधळ माजला, नच जिथें भेटे विचारी मला ॥
ऐसा, हे जग सर्वही कधि कधीं, बाजार भासे मला ।
वाटे कांहिं नको नको सुखहि तें, विश्रांति लाभो मला ॥ ६ ॥
नाना आकृतिरूपवर्णघटिता वस्तू असंख्यावधि ।
जेथें आकृति, वर्ण, रूप, गणना एकाहि नाहीं मिती ॥

---

१. दुकानदार.

पाहोनी नर गोंधळे, परि रमे एकयाच जागीं कुठें ।
नाहीं अंत जया, प्रदर्शन असें मात जगत् वाटतें ॥ ७ ॥
केव्हा, भ्रान्त जिथे बसूनि सगळे आणोनिया काढिले ।
अल्पांश सकला कळे, न सगळें, गर्वे परा दाटले ॥
बोले काहिं तरी, तसेंचि करितो, एके दुजाचें न ते ।
होतं काहि कसें तरी, जग भ्रमागेहा[1]’—परी भासते ॥ ८ ॥
केव्हां, कोणि जणों विचार करुनी शाखान्ति ही काढिली ।
सर्वां ग्राह्य असंचि ज्ञान वितरी, जीवा हिता जाहलों ॥
जीचे वर्ग तसेच कीं विषय ना त्यां अंत नाहींच हो ।
आहे हें जग पाहता कधिं मला, आला असा भास हो ॥ ९ ॥
आहे हें जग आरसा जणु मनोवृत्तीच जो दाविते ।
मेघाचे परि कीं नभापरि तसें माझे मना वाटतो ॥
सन्ध्याकाल असो, उषाहि विलसो, कीं घोर ऐशा निशें ।
फेकी सूर्य जसा जसा निज करां तैशाचि रूपें दिसे ॥ १० ॥
आकाशापरि, भानुच्या परि, नभांभोधीपरी काय हें ।
आहे पूर्ण अरूप, वर्णहि न ज्या ? ऐसें जगत् काय हें ? ॥
कां हो सर्वहि हें तरी मज असें साकार, रंगी, दिसे ।
ज्याच्या दिव्य करीं नभीं दिसत हें तो भानु कोठें असे ? ॥ ११ ॥
मायेचें पसरे धुकें सकल हें, सान्या दिशा कोंदल्या ।
भानू भास्वर आत्मचिन् कुणि तिथें आहे नभा तापला ॥
झाले इंद्रधनुष्य हें जग तिथें, वेदान्त हें बोलतो ।
देखाया मग भानु तो उसळुनी हा जीव वेडावतो ॥ १२ ॥

---

१. Lunatic Asylumn ( पागलखाना ).

हे भाग्यो ! मज दर्शना वितार रे ! मागू तुझें काय मी ? ।
काढ तू नच हे कळे तरि तुला मी नम्रभावें नमी ॥
किंवा शोधु तला कुठें तरि कशा ? सारें जगी तूच हा ।
मी विश्वा, मग आत्मयादि, नमितों मानूसि वदावया ॥ १३ ॥

---

# जग दुःखी कोणीं केलें ?

[ वृत्त–वसंततिलका ]

सारे जगी रडति कीं " जगि दुःख आहे ।
का दुःखमूळ जग निर्मियलें असें हें ? ॥
मूळांत नाहिं तरि कोठुनि दुःख आलें ? ।
नाहीं तरी जग असें पुणि दुःखि केलें ? " ॥ १ ॥
रे, सूकरापरिस लोळुनि स्वार्थि येना –।
तेव्हा धरोनि कुणि लोळवि काय होतां ? ॥
आतां बसोनि रडता " जग दुःखि झालें ! " ।
कोणीं, वदा मजसि, हें जग दुःखि केलें ? ॥२॥

तें व्यक्तित्व[1] जगता कुणि निर्मियेलें–।
निःस्नेह, रुक्ष, जग सर्व जयें जहालें ? ॥
आतां स्वयें रडतसां ' जग दुःखि झालें ! " ।
कोणीं, वदा मजसि, हे जग दुःखि केलें ? ॥ ३ ॥
" व्यापार " केलि जगतांतिल सर्व नातीं ।
मांगल्य मारुनि समस्तहि केलि माती ॥
आतां बरें कडु तुम्हां फळ हें उदेलें ।
आतां कशासि रडतां " जग दुःखि झालें " ? ॥ ४ ॥
" स्पर्धा[2] " तुम्हांसि परदुःख विलास ' वाटे ।
" स्पर्धे " त जो हरत त्या हृदयांत कांटे–॥

---

१. Individualism. २. Competition.

केसे,[1] किती रुतति हें कधिं पाहियेले ? ।
आतां पुन्हा विव्हळता " जग दु:खि झालें " ' ॥५॥
" साम्राज्य " ! एकचि पिसं सकळांचे राष्ट्रां ।
खाण्वा दुज्या करिति सर्वीच तीव्र दंष्ट्रा ॥
ऐशा परस्परवधार्थ तुम्हा घडीलें ? ।
आतां पुन्हा रडतसा " जग दु:खि झालें " ? ॥ ६ ॥

उत्पन्नही करुनि आधि " उदात्त स्वार्थ "[2] ।
' युद्ध, अहा " म्हणतसा ' जगिं हो अनर्थ ! " ॥
युद्धे जगा असुखि काय पशूंहि केलें ? ।
कोणीं वदा मनुजसि रे जग दुःखि केलें ? ॥ ७ ॥
राष्ट्रांत स्वार्थ, मनुजातहि नीच स्वार्थ ।
व्हावे कमी जगतिं केवि वदा अनर्थ ? ॥
क्रौर्याविणें मग दुजा मुळि " धर्म " नाहीं ।
दु:खी न हो तरि वदा जग काय होई ? ॥ ८ ॥
स्वार्थामुळें जगत निर्घृण, क्रूर झालें ।
क्रौर्यामुळें जगति सर्व अनर्थ आले ॥
केलें स्वतासि अति दु:खि तुवां स्वहस्तें ।
आता रडोनि जगता ! वद काय होतें ! ॥ ९ ॥
रे वासना धरुनि क्षुद्र, अनर्थ केले ।
दैवी उदात्त गुण सर्व लयासि नेले ॥

---

१ पाठभेद -- भूलीं दयाचि पुरली मन रुक्ष झालें ।

२. " Noble selfishness "—Lord Morley.

" दुःखी "–पुन्हां पुसतसा–" जग केवि झालें ? ।
तुम्हींच रे जग समस्तहि दुःखि केलें ॥ १० ॥
आहे जया जगति स्वार्थ " उदात्त " ऐसा ।
युद्धापरी रुचति क्रूर विलास देशा ॥
दैवी गुणीं अभिरुची जनतेस नाहीं ।
होणें असें जग सुखी कधिं शक्य नाहीं ॥ ११ ॥

सजीव पेशी निर्जिव घेउनि, सजीव निर्जिव दोन तरी ।
नित्य भासवी, फसवाफसवी काय याहुनी जगिं दुसरी ? ॥ १० ॥
साली, पानें, मुळें, कांहिं तरि घालुनियां मनुजा जठरी ।
मेंदूपाशीं नेउनि त्यांचे विचार चिन्मय नित्य करी ! ॥
एकाच्या शिरिं शिरोनि बनतो विचार सुंदर काव्याचे ।
तोचि शिरोनी शिरीं दुजाच्या विचार बनतो सूडाचे ! ॥
पाला होतो विचार कैसा ? मजला किमिया सांगा हो ।
किमिया कैची !--नजरबंदि ही, ठकबाजीची युक्ति हो ! ॥
खनिज खाउनि उद्भिज जगतें, उद्भिज खाउनिया प्राणी ।
प्राणिहि प्राण्या खाऊं लागले ! परी अचंबा करि न कुणी ! ॥११॥
सजीव उद्भिज, सजीव प्राणी, सजीव मानवही आहे ।
' जीव ' तरी हे इतुके झाले कैसे ? मजला न कळे हें ॥
' जिवंत असणें ' एकचि असतां अनेक त्यातें भासवितो ।
नयनीं टाकुनि धूळ पहा हा उगा जगाला फसवीतो ॥
जिवंत असणें एक नसे तरि, भिन्न तरी झालें कैसें ? ।
भिन्न नसे तरि, एक असोनी अनेक भासें का ऐसे ? ॥
तुझेंच लबाडी आहे सारी गमतें मजला याच्यात ।
कांहिं तरि कैसें तरि भासवि, हसतो चोरुनि गालांत ! ॥ १२ ॥
बुरखा ना रे, बुरखा सारा, बुरख्याची ही करामत ! ।
खनिज वेगळें भासवुनीया चोरुनि शिरतो वृक्षात ॥
' वृक्षजाति ही सर्व वेगळी ' भासवुनी बुरखा घेतो ।
पाय चोरटे टाकुनि पळतो, हळूच प्राण्यामाधि शिरतो ॥
प्राण्यामाजी पुन्हा ' मूढ मी, कांही मजला उमजे ना '- ।
दाखवि ढोंगे, बुरखा घेई, तेथुनि हलके पळे पुन्हा ॥

मनुजामाजीं पुन्हां उमटला ! नीट शहाणा दिसताहे ।
उगाच दुर्गुण भलते कारतो, रडे पडे, दुःखित राहे ! ॥ १३ ॥
" दुःखाचें "–मग म्हणतो–" कारण आतां कळलें मजलागी ।
बाह्य जगाच्या रूपें मीं जो पळतों त्याच्यामागें मी ! ॥
हेंच असे कारण मम दुःखा ! " निमित्त ऐसे हा सांगे ।
" ज्ञान अतां मिळवीन " म्हणोनी ज्ञानामागें मग लागे ॥
ज्ञान काय तें ऐका आता, ' ज्ञान ' हि त्याचें गमतीचें ।
म्हणे " कोण मी कळलें आतां ! "–' ज्ञान ' गरजतें जें तें हें ! ॥
अतचि नाहीं त्याच्या ढोंगा, ढोंगासाठीं जणुं जन्मे ।
अंताचि नाहीं ढोंगा म्हणुनिच अनंत म्हणती का तूतें ? ॥ १४ ॥

[ ३ ]

मायावनिंचीं ढोंगें त्याचीं सांगूं कैसीं, कितीं तरी ।
नरदेहातें घडवुनि हातें येउनि राहे तयान्तरीं ॥
झोप कशाची अनंत जो त्या ? झोपेचें परि ढोंग करी ।
" झोप येतसे मला " म्हणे, हा खराचि निजतो धरेवरी ! ॥
" आतां निजतों " म्हणे, लावितो डोळे, निजतो खरेखरी ! ।
काय ढोंग हो पहा भयंकर ! अनंत निजतो कधीं तरी ? ॥
ऐसीं ढोंगें परी करीतो; खंतहि त्याला नाहीं हो ।
कुणी ओळखी, हसतो अणखी, लाजहि त्याला नाही हो ! ॥ १५ ॥
पृथ्वी घडिली गाल तयानें, जाव पेरिले सर्वकडे ।
आकाशामधिं फेकुनि दिधली, काय, बघे ना, घडे पुढें ॥
पायानें हे सगळे चिकटति धरेसि, म्हणती " वरती मी " ।
परस्पराच्या उलट बाजुला सर्वचि सरके ! बहु नामी ! ॥
नभ सर्वांना दिसे शिरावरि, ' मी सरका ' सर्वां वाटे ।
काय टवाळी उगी अनंता ! जगताची ही करिसी रे ! ॥

काय मदालस नम ललनेस आला !
आलस्य जांभइ सदा सुचवी जगाला ॥
तीचा मिटे न कधिं, शाश्वत आ'च झाला !
५
तो आ' अहो सुखवितो किति हो मनाला! ॥५॥
जिव्हाग्रिं जी नित सरस्वति राहताहे !
तीचें फुटे सर मनोहर वारि वाहे ॥
घेई उडी त्यजुनि ओष्ठ–कडेपठार !
तो चतवो मदन हो जलपात थोर ! ॥ ६ ॥
आयवळा वदनचंद्र निसा सुधेनें !
तो वाहतो धरुनि भिन्न अनेक नांवें ॥
नाकान, नेत्रि. वदनींहि, सुधाब्धि वाहे !
एशी म्हतारि ललना जगिं धन्य आहे ! ॥ ७ ॥
६
तीचे "अकुंकुम कलंकित" दृढ भाल।
होते कसें ! नवल हें मज फार काळ ॥
७
कीं धूत वाळत नदीतटिं घातलेले !
त मारमादवसन प्रभु ! भासले रे ! ॥ ८ ॥
ते हद जाडि सुगाड म्हण येले !
छाटे गानी तुरक छान नवीन आले ॥
ज प्राणि हा प्रथम कोण हळूच होता !
ज्यांचा प्रभाव करितो जन वान्ति-कर्ता ॥ ९ ॥

---

४ नागारंग कोळशासारखी
५ पाठभेद –लावण्यगर्वे तरुणीस ठार मला ! ॥ ५ ॥
६. भवभूति ७ नागिन नदन, ८ सहान्ती.

ती एक लहु भ्रमर कधि एकदाशी ।
त्रस्ता, स्वरूपखनि कण्वसुता ठरे ती ॥
थोडी सदा नविन षट्पदवृंद होला ।
भाग्ती झाला रिझलाच सवाइ शकुंतला[८][९] ॥ १० ॥
नेत्रा, पद्मा, कमल वक्त्रकरां म्हणोती ।
ही तों सबध कमलापरि खास होती ॥

---

८ म्हणजे सवाई माधवराव, सवाई गंधर्व इ०, त्याप्रमाणें सवाई शकुंतला हा सौंदर्याच्या बहुमानार्थ तिला किताब होय

९ या शब्दांतील "त" या अक्षरानें वृत्तभंग होतो असें कित्येक माथेफिरूचें म्हणणें आहे; पण त्याना इतकें कळत नाहीं कीं, कालिदास कांहीं मूर्ख नव्हता; या शब्दानें वृत्तभंग म्हणून काय म्हणतात तो दोष जर होत असता, तर त्यानें तरी हा शब्द आपल्या काव्यात कसा वापरला असता ? कालिदासानें हा शब्द आपल्या काव्यात कोठें तरी वापरला आहे असें आम्हास तरी वाटतें. नीट माहित नसतां एकदम दुसऱ्याला बोलून बतावयाचें ही हल्लींच्या काळच्या लोकांची अत्यंत वाईट खोड आहे तेव्हां हा माझा प्रयोग इतक्या चांगल्या आधारावरून बरोबर आहे असेंच धरून चालतों. पण इतक्याउपर नसते दोष चिचकीत बसण्याची ज्यास अरसिकपणाची हौसच असेल, त्यानीं आपल्या अरसिक समाधानाकरितां पाहिजे तर येथील च शकुंतला शब्दाचा "शकुंत्ला" असा खुशाल उच्चार करावा. मला त्यानें कांहीं बिघडत नाहीं.

तें तगडिद्वय, उभो जयिं राहते ते ।
वाटे पहा कमळनाळचि थेट मातें ! ॥ ११ ॥
नाळावरि उभि, अहा, जयिं राहते ते ।
देहीं सबध कमळापरि हो दिसे ते ॥
वातें सरोवरजळीं जशुं पद्म हाले ।
तेशी म्हतारि ललना डुलडूल डोले ! ॥ १२ ॥
देहीं सुनील रुचिरा अति कान्ति शोभे ।
देवें तिला सुरकुलीगण तोहि लाभे ॥
तेणें सुनील सलिलांत सुवीचिलीला ।
आलो सरस्तटिं गमे बघुनी तियेला ॥ १३ ॥
साकार ईश्वर बघोनि हिला निमाला ।
आकाशिं जाउनि निराकृति आधिं झाला ! ॥
ऐसी शिसारि बसली बघ आकृतीची ! ।
माझी हातारि मोडि[१०] खोड पहा हरीची ! ॥ १४ ॥
हळी, हरी मरत तैं, विधवा जहाली ।
टाकी पुसोनि नच ठेवित कुंकु भाळीं ॥
कीं चंद्रमा मग नभीं जगतास साचा ।
हा खालचा दिसत डागचि कुंकवाच्या ॥ १५ ॥

[ २ ]

त्याशी मारोनि पतिला ' बरसें ' जहालीं ।
आतां व्यथा विरहजन्य असह्य झाली ! ॥

---

१०. येवढ्या अक्षराचा कृपा करून ऱ्हस्व उच्चार करावा.

झाली कृशा, नयनिं नीर कधीं खळे ना।
खाण्या प्रयत्न करि हाय! परी गिळे ना! ॥ १६ ॥

रात्रिंदिनी प्रणयकेळि मनात खेळे।
रम्या झतारि विरहें हृदयात पोळे ॥
काळीं खचन करुनी विरहानलमें।
लागे न झोंप सतिला मदनज्वरानें ॥ १७ ॥

तद्दी पतीचरणि नित्य विचारलीना।
बोले कुणी तरिहि में मुळि ऐकु ये ना! ॥
आला कुणी जवळिही तरि तो दिसेना! ।
हा! हा! झतारि विरहें वध झालि दीना! ॥१८॥

सोसे न जे विरहवर्धक ते भ्रणोनी।
टाळावया करित नेम; अशी शहाणी! ॥
आधीं सुखें पतिकर कुरवाळियेला।
तो रम्य कुन्तलकलाप लयास नेला ॥ १९ ॥

टाकी न सर्व मग एकचि वस्तु ठेवी।
तीचीं रसाळ चरितें किति हो वदावीं! ॥
होती पतीकरपुनीत विशाल काठी।
प्रेमण प्रखूण म्हणुनी नित ठेवि हातीं ॥ २० ॥

तांबूल नित्य पतिचर्वित सेवनाला।
अभ्यस्त ही बघ असे कमनीय बाला ॥
मेला पती करिल काय बिचारि याला?।
खाते म्हणानि कुटुनी नित तांबुलाला ॥ २१ ॥

मराठी ग्रं... संग्रहालय
क्र. 2824

[ ३ ]

एके दिनीं विरहविद्ध विशेष झाली ।
रामापरीं[11] स्वपति शोधित सर्व ठायीं ॥
कीं आगपेटित तुझा पति त्याम आहे ।
ऐसे तिला कथिति ! दुष्ट पहा कसे हे ! ॥ २२ ॥
भाळी, पती म्हणुनि घेत पतिव्रता ती ।
ती एक कांडसचि सल्फर-फैल होती ॥
गालीं वरा फिरवि प्रेमभरें सती ती ।
ओहो ! चमत्कृति ! पतिप्रति प्राणज्योती !! ॥२३॥
झीचाहि घोर मदनानल पेट घेत ।
हा ! हा ! सकळ जळली नवबोडक्यान्त[12] !!! ॥
नाही जया कळत ते म्हणती जळाली ।
माझी म्हातारि ललना विरहेंच मेली !! ॥ २४ ॥

---

११. श्रीरामचंद्रानें सीतादेवीला शोधलें त्याप्रमाणें.

१२. कारण 'श्रीमती म्हातान्या ललनेला' शिक्षा नव्हती.

REFBK-0002824

समाप्त